रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २८९
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, ८ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे!




छाया : हरेश इंडोरे (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

अंतरंग

आजपासून वाशी ते पनवेल वातानुकूलित शिवनेरी सेवा/२

नेरळमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ; एकाच रात्री चार चोऱ्या/५

बेशिस्त रिक्षाचालकांविरोधात तक्रार करण्याचे आवाहन/६

# स्व. जनार्दन भगतसाहेबांनी समाजहिताची शिकवण दिली

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

### संस्था व व्यक्तींचा गुणगौरव; स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धेचे शानदार पारितोषिक वितरण



पनवेल : हरेश साठे

**राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे असते ही समाजहिताची शिकवण दिवंगत जनार्दन भगतसाहेबांनी दिली, असे प्रतिपादन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी (दि. ७) उलवे नोड येथे केले. ते भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव तसेच पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२३चे पारितोषिक वितरण उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे समारंभपूर्वक झाले. या वेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तत्पूर्वी, शेलघर येथील निवासस्थानी भगतसाहेबांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून शकुंतला रामशेठ ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, प्रा. डी. एन. माने, माजी सरपंच पांडुमामा घरत, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, खजिनदार भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय पाटील, संजय भगत, अजय भगत, वसंत पाटील, हरिश्चंद्र पाटील, संजय गोंधळी, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, अमोघ ठाकूर यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, तेजस कांडपिळे, विकास घरत, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कल्पना ठाकूर, वृषाली वाघमारे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, दा. चां. कडू, विश्वनाथ कोळी, शरद खारकर, अनंत ठाकूर, जयवंत देशमुख, अनिल देशमुख, हेमंत ठाकूर, रतन भगत, प्रदीप भगत, अमृत भगत, सी. एल. ठाकूर, अरुण ठाकूर, श्रीकांत घरत, रवींद्र भगत, किशोर पाटील, व्ही. एन. भोईर, सुरेश पाटील, चंद्रकांत घरत, शिवाजी दुर्गे यांच्यासह भगतसाहेबांचे कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पंचक्रोशीतील असंख्य नागरिक उपस्थित होते. (पान २ वर..)

जनार्दन भगतसाहेबांच्या निधनानंतर त्यांचा पुतळा उभारावा असे सर्वांच्या मनात आले, पण त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सूचनेनुसार भगतसाहेबांच्या नावाने शैक्षणिक संस्था उभारण्याचा निर्णय घेतला. भगतसाहेबांच्या मरणोत्तर त्यांच्या नावाने उभारलेली संस्था या विभागाला मिळालेला पुरस्कार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्था पुढे नेत दर्जेदार केली असून रामशेठ ठाकूर यांच्या पाठीशी आम्ही नेहमी आहोत.

–**जे. एम. म्हात्रे**, माजी नगराध्यक्ष

भगतसाहेबांचे कार्य अजरामर आहे. ते अष्टपैलू नेतृत्व होते. आर्थिक आणि शारीरिक शक्तीपेक्षा सामाजिक हित त्यांना महत्त्वाचे होते. त्यांनी कधीही आराम केला नाही. त्यांचे कार्य एवढे अफाट आणि प्रेरणादायी होते की ते आपल्या समवेतच आहेत असे वाटते. त्यामुळे त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य त्यांचे जावई लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हातून ते पूर्ण करून घेत आहेत.

–**वाय. टी. देशमुख**, उपकार्याध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था

कर्मवीर पुण्यतिथीप्रमाणे आजचा हा दिमाखदार सोहळा आहे. संस्थेचे छोटेसे रोपटे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे वटवृक्षात रूपांतरित झाले. दर्जेदार शिक्षण देण्याचे काम जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था करीत आहे. कामानिमित्त इंग्लंडला गेलो असताना त्या ठिकाणच्या मॅगझिनमध्ये या संस्थेचा उत्कृष्ट संस्था असल्याचा उल्लेख पहायला मिळाला. त्यामुळे या संस्थेची फक्त भारतात नाही, तर जगभर ख्याती पसरली असल्याचे अधोरेखित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी 'रयत'ला भरभरून दिले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेला दर्जेदार केले. भगतसाहेबांचा वारसा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खऱ्या अर्थाने जपण्याचे काम केले आहे.

–**महेंद्र घरत**, अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस

स्वच्छतेचे महत्त्व जनार्दन भगतसाहेबांनी जाणले होते. शिक्षण आणि स्वच्छता भगतसाहेबांचा पिंड राहिला. भगतसाहेबांवर ८४ गावांचा न्याय निवाडा करण्याची जबाबदारी होती आणि ती ते सामाजिक भूमिकेतून योग्यरित्या पार पाडायचे. म्हणूनच कोणावरही कधीही अन्याय झाला नाही. भगतसाहेबांनी शांतीदूत म्हणून काम केले. भगतसाहेब नसते तर विकासाच्या दृष्टिकोनातून विभाग मागे पडला असता. त्यांच्या नावाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उभारलेल्या संस्थेने जगभरात नावलौकिक मिळवला असून भगतसाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून होत आहे.

–**अरुणशेठ भगत**, अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था

स्वच्छतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आजची आणि उद्याचीही स्वच्छता गरज आहे. त्या अनुषंगाने दरवर्षी भगतसाहेबांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

–**परेश ठाकूर**, सचिव, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ






### लहानग्यांनीही व्यक्त केले मनोगत

या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नातू आदेश परेश ठाकूर आणि आदित्य परेश ठाकूर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या कार्याचा उजाळा मनोगतातून मांडला. भगतसाहेबांचे योगदान, कामगार व त्यांचा संप, स्वच्छता, आवडनिवड, समाजसेवेचे प्रेम, समाजहित, समाजसेवेचा छंद असे भगतसाहेबांचे अनेक पैलू विस्तृत आणि ओघवत्या शैलीत त्यांनी मांडले. त्याचबरोबर विद्यार्थी मनोगतात सायली औटे व श्रवण कदम यांनी ओजस्वी भाषणातून भगतसाहेबांचे जीवनकार्य विषद केले. या वेळी सत्कारमूर्ती शाहू इन्स्टिट्यूटचे प्रमुख जयंत भगत यांनी सत्काराला उत्तर देताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार व्यक्त केले.

### या ग्रामपंचायतींना मिळाला पुरस्कार

**स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२३ पारितोषिक**

- प्रथम क्रमांक : शिवकर ग्रामपंचायत (एक लाख रुपये व सन्मानचिन्ह)
- द्वितीय क्रमांक : कुंडेवहाळ ग्रामपंचायत (५० हजार रुपये व सन्मानचिन्ह)
- तृतीय क्रमांक : सावळे ग्रामपंचायत (२५ हजार रुपये व सन्मानचिन्ह)
- उत्तेजनार्थ : वलप आणि चिंध्रण ग्रामपंचायत (प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह)

### या संस्था व व्यक्तींचा गुणगौरव

- भारत सरकारतर्फे स्वच्छ शाळा सन्मानित रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर (पुरस्कार स्वरूप–शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र)
- नॅकची ए+ ग्रेड प्राप्त व ऑटोनॉमस उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून राज्यस्तरीय १४वा आणि देशपातळीवर २८वा क्रमांक पटकाविणारे चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त महाविद्यालय (पुरस्कार स्वरूप–शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र)
- राज्यस्तरीय स्वच्छता पुरस्कार पटकावणारे भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी (पुरस्कार स्वरूप–शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र)
- आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष (पुरस्कार स्वरूप–५१ हजार रुपये)
- गिनिज बुक ऑफ रेकॉर्डप्राप्त जलतरणपटू प्रभात कोळी (पुरस्कार स्वरूप ५१ हजार रुपये)
- शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पनवेल (पुरस्कार स्वरूप–शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र)
- प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली राजपथ येथे परेड करण्यासाठी निवड झालेले ओमकार कैलास देशमुख व प्रांजली दिलीप चव्हाण (पुरस्कार स्वरूप–प्रत्येकी ११ हजार रुपये)
- चित्रकार गिरीश पाटील (पुरस्कार स्वरूप–५१ हजार रुपये)
- यंगेस्ट इंडियन गर्ल टू स्केल माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्प साईशा मंगेश राऊत (पुरस्कार स्वरूप–२५ हजार रुपये)
- राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत रौप्यपदक पटकाविणारे श्रीश किरण म्हात्रे आणि विशाल अरुणा तायडे (पुरस्कार स्वरूप–शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र).

## निवडक

### पुलवामात दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला; एकाला अटक

**पुलवामा** : जम्मू काश्मिरमधील पुलवामा येथे पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला असून अरिगाम भागातून इशफाक अहमद वानी नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. त्याच्याकडून पाच ते सहा किलो आयईडी जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पुढील वर्षी प्रजासत्ताक दिनी होणार स्त्रीशक्तीचा जागर

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने सैन्य आणि इतर क्षेत्रांमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्याच अनुषंगाने एक नवीन उपक्रम जाहीर करण्यात आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार २०२४च्या प्रजासत्ताक दिनी दिल्लीत जे परेड, मार्च पास्ट आणि सादरीकरण होईल त्यामध्ये पूर्णपणे महिलांचा सहभाग असेल. संरक्षण मंत्रालयाने यासंबंधी आदेश काढले आहेत.

## मणिपूरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साधला संवाद

### विशेष विमानाची व्यवस्था करण्याचे निर्देश

मुंबई : प्रतिनिधी

मणिपूरमध्ये सुरू असलेल्या दंगलीमुळे तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ७) दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि त्यांना दिलासा देऊन सर्वतोपरी मदतीची ग्वाही दिली. दरम्यान, या अडकलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली असून लवकरच हे विमान अडकलेल्या २२ विद्यार्थ्यांना घेऊन महाराष्ट्रात दाखल होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी मणिपूरच्या एनआयटी, आयआयटीमध्ये शिक्षण घेत असून यातील तुषार आव्हाड आणि विकास शर्मा या विद्यार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधला व चर्चा करून त्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. या संदर्भात राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी मणिपूरच्या मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्याची विनंती करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.



विद्यार्थ्यांशी चर्चा केल्यानंतर आणि परिस्थितीची संपूर्ण माहिती घेतल्यावर या विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी विशेष विमानाची व्यवस्था करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. लवकरच हे विमान या अडकलेल्या विद्यार्थ्यांना घेऊन महाराष्ट्रात येईल. राज्य शासन मणिपूरमधील परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**आसामच्या मुख्यमंत्र्यांशीही चर्चा**

मणिपूरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना सुरक्षा पुरविण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह आणि आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. मणिपूरमध्ये अडकलेल्या २२ विद्यार्थ्यांना विशेष विमानाने महाराष्ट्रात आणण्यात येणार असून तत्पूर्वी या विद्यार्थ्यांना मणिपूरहून आसाममध्ये आणण्यात येईल. मणिपूरहून आसामपर्यंत आणताना या विद्यार्थ्यांना विशेष सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री शिंदे यांनी आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा व मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

## सत्तासंघर्षाचा निकाल लवकरच लागेल –निकम

नाशिक : प्रतिनिधी

राज्यातील सत्तासंघर्षाचा निकाल कधी लागणार असा प्रश्न सर्वांनाच पडला असताना आता त्यावर ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्वल निकम यांनी मत व्यक्त केले आहे. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाबाबत निकाल कधी लागेल हे सध्या सांगणे अवघड असले तरी सर्वोच्च न्यायालयातील काही न्यायाधीश निवृत्त होणार असल्याने निकाल लवकर लागेल ही अपेक्षा आहे, असे निकम यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि. ७) नाशिमध्ये बोलत होते.

राज्यातील सत्तासंघर्षाची सुनावणी ज्या घटनापीठासमोर सुरू होती त्या घटनापीठातील काही न्यायाधीश निवृत्त होणार आहेत. ही सुनावणी पूर्ण झाली असून लवकरच या प्रकरणाचा निकाल लागण्याची अपेक्षा आहे, असे निकम या वेळी म्हणाले.

## गुजरातची विजयी घोडदौड




अहमदाबाद : गुजरात टायटन्सने आयपीएलमध्ये विजयी घोडदौड कायम ठेवत रविवारी लखनऊ सुपरजायंट्स संघाला ५६ धावांनी धूळ चारली. गुजरातने प्रथम फलंदाजी करताना शुबमन गिल व वृद्धिमान साहाच्या झंझावाती अर्धशतकांच्या जोरावर २ बाद २२७ धावा केल्या होत्या. लखनऊला ७ बाद १७१ धावाच करता आल्या.

# उद्धव ठाकरे यांच्या बारसू भेटीकडे प्रकल्पग्रस्तांची पाठ -उदय सामंत

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील बारसूमधील प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विरोधातील शेतकऱ्यांना भेटण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बारसू भेटीकडे प्रकल्पग्रस्तांनी पाठ फिरविली. त्यामुळेच ठाकरे यांना बाहेरची माणसे घेऊन जावे लागल्याची टीका उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी केली. प्रकल्पविरोधकांना भेटणाऱ्या ठाकरे यांनी प्रकल्प समर्थकांनाही भेटायला हवे होते असा टोलाही त्यांनी लगावला. उद्धव ठाकरे यांनी प्रकल्पस्थळी बारसू आणि सोलगाव आदी ठिकाणी भेट देऊन प्रकल्प विरोधकांशी संवाद साधला. ठाकरे यांच्या या भेटीवर रायगडचे पालकमंत्री सामंत यांनी टीका केली.



समाज माध्यमाच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधताना सामंत यांनी, ठाकरे यांच्या बारसू भेटीचा अट्टहास का होता अशी विचारणा केली. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या अहवालानुसार ठाकरेंनी ग्रामस्थांशी संवाद साधला त्यावेळी तेथे ग्रामस्थांपेक्षा बाहेरून आणलेली संख्या जास्त होती, असा दावा सामंत यांनी केला. ठाकरेंनी पंतप्रधानांना १२ जानेवारी २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवताना ग्रामस्थांना विश्वासात का घेतले नाही. या पत्राच्या माध्यमातून त्यांनीच ही जागा सुचविली आणि या प्रकल्पामुळे कोकणाचा विकास होईल असा दावाही केला होता. मात्र आता त्यांनी भूमिका का बदलली याचा खुलासा ठाकरे यांनी करावा अशी मागणी सामंत यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाबतीतल्या सर्वच शंका दूर करून आम्ही हा प्रकल्प पुढे नेऊ, शेतकऱ्यांना बाजूला ठेवून, अडचणीत आणून, वेगळे निर्णय न घेता प्रकल्प चांगल्या पद्धतीने शेतकऱ्यांना समजावून सांगून हा प्रकल्प राबविला जाईल.

# कर्जत मतदारसंघातील अनेकांचा शिवसेनेत प्रवेश



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

रायगडातील कर्जत मतदार संघातील तांबाटीवाडी या गावातील तरुण, महिला आणि ग्रामस्थांनी नुकताच कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्याने प्रभावीत होवुन कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे यांचा उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करत शिवसेनेविषयी विश्वास व्यक्त केल्याची माहीती कर्जत शिवसेना पक्षाकडुन देणेत आली आहे. तालुका समन्वयक अमोल बलकवडे यांच्या नेतृत्वात ठाकरे गटात प्रवेश केलेले तरुणही यावेळी पुन्हा स्वगृही परतले आहेत.




या प्रवेशावेळी विलास बलकवडे, अल्पेश बलकवडे, सचिन बलकवडे, मंगेश बलकवडे, राजेश बलकवडे, रुपेश बलकवडे, सुयोग सावंत, सुरज सावंत, जनार्दन सावंत, चंद्रकांत सावंत, कल्पेश सावंत, उदय चव्हाण, प्रफुल्ल चव्हाण, संजय कदम, ओम कदम यांच्यासह गावातील अनेक तरुण वर्ग तसेच महिला भगिणींनी शिवसेनेत प्रवेश केल्याचे सांगणेत आले आहे.

दरम्यान या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, मा. उपसभापती मनोहर थोरवे, तालुका प्रमुख संदेश पाटील, युवासेना तालुका प्रमुख रोहित विचारे, वडगाव जिल्हा परीषद संपर्क प्रमुख अरुणा सावंत, उप तालुका प्रमुख संतोष मुंढे, सल्लागार चंद्रकांत फावडे, विकास मुंढे उपस्थित होते. या प्रवेशाने ठाकरे गटाला हादरा बसला असून शिवसेना पुन्हा एकदा बळकट होत असल्याचे दिसून येत आहे.

# मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर साधणार जनतेशी सुसंवाद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर 'सरकार आपल्या दारी', 'जनतेशी सुसंवाद' कार्यक्रमाच्या माध्यमातून येत्या बुधवार आणि गुरूवारी नागरिकांशी संवाद साधणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमात नागरिकांनी



शासकीय योजना, आपल्या प्रभागातील विकासकामांबाबत सूचना व इतर समस्यांबाबतच्या निवेदन अथवा अर्जासह उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

बुधवारी १० मे रोजी महानगरपालिकेच्या 'सी वॉर्ड' मध्ये कॉन्फरन्स हॉल, सी विभाग कार्यालय, चंदनवाडी, मरीन लाईन्स येथे तर गुरूवार दि ११ मे रोजी 'डी वॉर्ड' मध्ये कॉन्फरन्स हॉल, डी विभाग कार्यालय, ग्रँट रोड (प.) येथे सायंकाळी ४ ते ६ या वेळेत पालकमंत्री श्री. केसरकर नागरिकांशी संवाद साधण्यासाठी उपस्थित राहतील. त्याचप्रमाणे 'जनतेशी सुसंवाद' कार्यक्रमास पालकमंत्री यांच्यासोबत संबंधित विभागांचे लोकप्रतिनिधी, सर्व विभागांचे शासकीय तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. केसरकर यांनी केले आहे.

# डोंबिवलीत विधवा महिलेची हत्या; चोरीच्या उद्देशाने हत्या झाल्याचा संशय

**मुंबई : प्रतिनिधी**

डोंबिवली जवळील २७ गावांमधील घारिवली गावात शुक्रवारी रात्री एका विधवा महिलेची तिच्या राहत्या घरात अज्ञात इसमाने हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. या महिलेच्या गळ्यातील, घरातील सोन्याचा ऐवज चोरीस गेला आहे. चोरीच्या उद्देशाने ही हत्या केली गेली आहे, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. अनिता पाटील (६५) असे मयत महिलेचे नाव आहे. अनिता पाटील या घारिवली मधील अर्जुन एम्पायर इमारतीत एकट्याच राहत होत्या. त्यांना एक विवाहित मुलगी आहे. नेहमीप्रमाणे मुलगी त्यांना सकाळच्या वेळेत मोबाईलवरून संपर्क करायची.

शनिवारी सकाळी आई अनिताला सतत संपर्क करुनही ती प्रतिसाद देत नव्हती म्हणून मुलीला संशय आला. ती तातडीने आई अनिताच्या घारिवली येथील घरी आली. बराच वेळ दरवाजा ठोठावुनही दरवाजा उघडला नाही. शेजाऱ्यांच्या मदतीने खिडकीतून अनिता यांच्या घरात डोकावून पाहिल्यावर मृतावस्थेत घरात पडल्या होत्या.

त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने गायब झाले होते, असे दृश्य मुलीला दिसले. चोरीच्या उद्देशाने चोरट्याने अनिता यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या अंगावरील दागिने काढून घेत असताना त्यांनी प्रतिकार केल्यामुळे चोरट्याने आक्रमक प्रतिवाद करुन त्यांची हत्या केली असण्याचा संशय पोलिसांना आहे.

# वाघाच्या हल्ल्यात मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांस पाच लाखांची मदत

### वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते धनादेश प्रदान

**चंद्रपूर : रामप्रहर वृत्त**

चंद्रपूरच्या इंदिरानगर येथील रहिवासी पुरुषोत्तम बोपचे (वय ४० वर्षे) हे फुले वेचण्यासाठी जंगलात गेले असता वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुरुषोत्तम बोपचे यांच्या कुटुंबीयांस शासन नियमानुसार मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार वन विभागातर्फे पुरुषोत्तम बोपचे यांच्या कुटुंबास ५ लाख रुपयांचा धनादेश वनमंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी कारेकर, माजी उपमहापौर राहुल पावडे, देवराव भोंगळे, पप्पू बोपचे, आशिष ताजने उपस्थित होते.

पान १ वरून

## स्व. जनार्दन भगतसाहेबांनी समाजहिताची शिकवण दिली

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले की, स्व. जनार्दन भगतसाहेबांनी केलेल्या कार्यामुळे हा परिसर नावाजला. शिक्षण, न्याय देण्याचे काम त्यांनी केले. अहोरात्र समाजाची सेवा हाच त्यांचा उद्देश कायम राहिला. ८४ गावांचा न्याय निवाडा करीत असताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली. भगतसाहेबांनी अहोरात्र आपला देह बहुजन हिताय, बहुजन सुखाय या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्र्य व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामुळेच होऊ शकेल हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना भगतसाहेबांच्या अंतःकरणात कायम होती. त्यांची शिक्षणाविषयी असणारी प्रचंड आस्था, तळमळ या इच्छापूर्तीच्या उद्देशाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना करण्यात आली. त्यांचे काम पुढे सुरूच ठेवणे ही त्यांना श्रद्धांजली आहे, असे सांगतानाच भगतसाहेबांचे शिष्य म्हणून काम करीत राहूया, असे आवाहनही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

भगतसाहेबांची जयंती २९ फेब्रुवारीला असल्याने लीप वर्षाच्या अनुषंगाने दर चार वर्षांनी येते. त्या वेळी महाराष्ट्र स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंताचा पाच लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचे ठरवले. त्यानुसार पहिला मान थोर विचारवंत स्व. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना दिला गेला. त्याचप्रमाणे पुढेही दर जयंतीला मान्यवरांना गौरविण्यात येणार असून २०२८ साली भगतसाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने त्या वेळी महाराष्ट्र स्तरावरील आणि संपूर्ण फेब्रुवारी महिनाभर विविध कार्यक्रम घेणार असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी जाहीर केले तसेच पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायती आणि विविध क्षेत्रांतील गुणीजनांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी विशेष अतिथी म्हणून प्रा. डी. ए. माने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ९ मे रोजी सातारा येथे कर्मवीर तीर्थक्षेत्री होणारा सोहळा रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली होतो आणि त्या ठिकाणी शरद पवार यांच्याप्रमाणे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचेही मानाचे स्थान असते. लोकनेते रामशेठ ठाकूर व आम्ही त्या ठिकाणी 'कमवा व शिका' योजनेत शिकलो. खडी फोडणे, शेती, पिठाची चक्की चालवणे ही कामे करून आम्ही स्वावलंबी शिक्षण घेतले. कर्मवीर अण्णांच्या शिकवणीनुसार आम्ही त्या ठिकाणी घडलो. अण्णा व भगतसाहेबांची प्रेरणा घेऊन लोकनेते रामशेठ ठाकूर घडले. त्यांनी फक्त या विभागाकरिता नाही, तर महाराष्ट्रासाठी काम केले आहे. म्हणूनच लोकनेते रामशेठ ठाकूर संपूर्ण रयतेचे आणि महाराष्ट्राचे आहेत. कर्मवीर अण्णांचा विद्यार्थी लोकसभेत मानाने विराजमान झाला हे त्यांच्या कार्याचा विजय असून सामान्यातील सामान्य माणसाच्या मनात रामशेठ ठाकूर यांनी घर केले आहे. मानवतावादी भूमिकेतून माणूस जोडणारे आणि माणुसकीचे नाते असलेले रामशेठ ठाकूर आहेत. त्यामुळे मोखाड्यात महाविद्यालयाला त्यांचे नाव देण्यात आल्याचे प्रा. माने यांनी नमूद केले. भगतसाहेब भगवंताची मूर्ती होती. संत गाडगेबाबांच्या विचारांचे ते पाईक होते. स्वच्छता हा त्यांचा मंत्र होता. त्यांचा आदर्श घेऊन या ठिकाणी वाटचाल सुरू असून इतिहासात नोंद होणारा हा ऐतिहासिक सोहळा असल्याचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या कार्याचा वारसा नेटाने पुढे चालविला जात असल्याबद्दल कौतुक केले. भगतसाहेबांचे रामशेठ ठाकूर, जे. एम. म्हात्रे व इतर मंडळी अनुयायी आहेत. त्याचप्रमाणे आम्हीही रामशेठ ठाकूर यांचे अनुयायी आहोत. रामशेठ ठाकूर यांनी आम्हाला पाठबळ दिले. मला त्यांच्यामुळे बळ मिळाले. त्यामुळेच मी पुढे जाऊ शकलो. लोकनेते रामशेठ ठाकूर दानाचा महासागर आहेत. त्यामुळे त्यांचे दातृत्व सर्वांनी स्वीकारले पाहिजे, असेही ते म्हणाले. माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनीही भगतसाहेबांच्या आठवणींना उजाळा देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत महानिर्मितीचे ७.५६ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

## तीन प्रकल्प अंतिम टप्प्यात

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यामुळे शेतीसाठी दिवसा भरवशाचा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने जून २०१७ मध्ये महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरु केली. त्यात ७.५६ मेगावॅटचे दोन सौर ऊर्जा प्रकल्प ५ मे २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले आहे.

नागेवाडी तालुका तासगांव जिल्हा सांगली या सौर प्रकल्पामुळे नजीकच्या चार गावांना नागेवाडी, अंजनी, वडगांव आणि लोकरेवाडी या गावातील सुमारे १२०० ते १३०० वीज ग्राहकांना याचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प महावितरणच्या ३३/११ के.व्ही. अंजनी नागेवाडी उपकेंद्राला जोडण्यात आला आहे. सुमारे १० हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च १५ कोटी आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई. एस.एल.(विकासक), मेसर्स टाटा (सब व्हेंडर) आहेत.

वालेखिंडी तालुका जत जिल्हा सांगली या सौर प्रकल्पामुळे नजीकच्या चार गावांना वालेखिंडी, बेवनूर, सिंदेवाडी आणि नवलेवाडी या गावांतील सुमारे एक हजार कृषी वीज ग्राहकांना याचा लाभ मिळणार आहे. सुमारे ८ हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च १२ कोटी आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल. (विकासक), मेसर्स टाटा (सब व्हेंडर) आहेत. नजीकच्या महावितरणच्या ३३/११ के.व्ही. वालेखिंडी उपकेंद्राला सदर प्रकल्प जोडण्यात आला आहे.

या दोन सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक पातळीवर प्रत्येकी १० ते १५ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. सौर ऊर्जेद्वारे मिळणारी वीज सुमारे रु.३.३० प्रती युनिट दराने मिळणार असून महावितरण समवेत वीज खरेदी करार करण्यात आला आहे.

आगामी काही महिन्यात महानिर्मितीचे बोर्गी(जिल्हा-सांगली) २ मेगावाट, कुंभोज(जिल्हा-कोल्हापूर) ४.४ मेगावाट, सोनगाव (जिल्हा-सातारा) ४.२ मेगावाट सौर ऊर्जा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत.

आजघडीला महानिर्मितीच्या एकूण ३६७.४२ मेगावॅट स्थापित क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज उत्पादन होत आहे. उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे निर्देशानुसार तसेच महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अनबलगन यांच्या मार्गदर्शनाखाली १०० मेगावाट सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी विकासकाला इरादा पत्र देण्यात आले आहे तसेच आर्थिक वर्ष २०२३-२०२४ करिता सुमारे १ हजार मेगावाट सौर ऊर्जा प्रकल्पांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून संचालक(प्रकल्प) आणि संपूर्ण सौर प्रकल्प चमू यासाठी परिश्रम घेत आहेत.

# अल्पसंख्याक समाजासाठीच्या कर्ज योजनेला इच्छुकांचा चांगला प्रतिसाद

### ३१ मेपर्यंत नवीन अर्ज करण्याची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज स्वरुपात उपलब्ध होणाऱ्या निधीतून राज्यात अल्पसंख्याक समाजासाठी व्यवसाय, उद्योग सुरु करण्याकरीता राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. संपूर्ण राज्यभरातून मुदत कर्ज योजनेअंतर्गत १ हजार ५५३ अर्ज विविध जिल्हा कार्यालयामध्ये प्राप्त झाले आहेत.

११ नोव्हेंबर २०२२ रोजी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती दिनापासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. मुदत कर्ज योजनेअंतर्गत छोट्या व्यवसायांना प्रथम प्राधान्य देऊन ३.२० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मंजूर करुन मंजुरी पत्र लाभार्थ्यांना निर्गमित करण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत राज्यातील ७८३ लाभार्थ्यांना आतापर्यंत मंजुरी पत्र निर्गमित करण्यात आले आहेत. कर्ज मंजुरीपत्र निर्गमित केलेल्या लाभार्थ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन स्थळ पाहणी करण्याच्या सूचना कर्ज वितरण अधिकारी व कर्ज वसुली अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

दस्तऐवजांची पूर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये कर्जाची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने कर्ज परतफेडी संदर्भातील बँकेकडील तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना कर्ज रकमेचे त्वरित वितरण करण्यात येईल, अशी माहिती मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. लालमिया शरीफ शेख यांनी दिली.

या योजनेला अल्पसंख्याक समाजाचा मिळालेला प्रतिसाद विचारात घेता प्राप्त झालेल्या अर्जावर जलदगतीने कार्यवाही करण्यासाठी ३१ मे २०२३ पर्यंत नवीन अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. प्राप्त झालेल्या अर्जाचा निपटारा करण्यासाठी ३१ मे २०२३ नंतर पुढील आदेश होईपर्यंत या योजनेअंतर्गत नव्याने अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत, असे डॉ. शेख यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत आतापर्यंत १ हजार ५५३ प्रस्ताव जिल्हा कार्यालयामध्ये प्राप्त झाले आहेत. यामध्ये मुंबईतून ४ अर्ज, ठाणे १, रायगड २, पुणे ८४, सोलापूर ४४, सातारा १२, सांगली १०, कोल्हापूर १०२, नाशिक ७, नंदुरबार १५, धुळे २९, जळगाव १०१, अहमदनगर ४२, औरंगाबाद ९६, परभणी १७३, बीड २१५, लातूर ५३, जालना ८२, हिंगोली ४३, नांदेड ९, उस्मानाबाद ६१, अमरावती १८, वाशिम ५४, बुलढाणा १५७, यवतमाळ ९७, अकोला २७, नागपूर १३, तर वर्धा जिल्ह्यातून २ अर्ज जिल्हास्तरावर प्राप्त झाले आहेत.


# तिहेरी अपघातात तिघे ठार, एक गंभीर

**बुलढाणा :** खामगाव-मेहकर मार्गावर देऊळगाव साकर्शा गावाजवळ दोन चारचाकी आणि एक दुचाकीच्या विचित्र अपघातात तीनजण ठार तर एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. शनिवारी रात्री उशिरा झालेल्या या तिहेरी दुर्घटनेत देऊळगाव साकर्शा येथील तिघांचा मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली असून मेहकर तालुका हादरला आहे. वीटभट्टी परिसरात भरधाव दुचाकीने आधी इर्टिका कारला धडक दिली. यामुळे अनियंत्रित झालेली दुचाकी पिकअपवर आदळली.

**दुखवटा**

## इंदुबाई पाटील

**पनवेल :** तालुक्यातील रोडपाली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अरुण अर्जुन पाटील यांच्या मातोश्री इंदुबाई अर्जुन पाटील यांचे वयाच्या ८५व्या वर्षी अल्प आजाराने निधन



झाले. या घटनेने समस्त पाटील कुटंबासह रोडपाली गावावर शोककळा पसरली आहे. पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अमर अरुण पाटील यांच्या त्या आजी होत्या. त्यांच्या पश्चात अरुण अर्जुन पाटील, कृष्णा अर्जुन पाटील दोन मुले, सुना, मुली नातवडे असा परिवार आहे. कै. इंदुबाईंचा दशविधी सोमवारी ८ मे रोजी नाशिक क्षेत्र येथे होणार असून उत्तरकार्य रोडपाली येथील राहत्या घरी गुरुवार ११ मे रोजी होणार आहे. त्यानिमित्त नारदीय कीर्तन हे कीर्तनकार रोहिणी परांजपे-माने यांचे होणार असून त्याला सुधीर टेकले व मधुकरबुवा धोंगडे यांची साथ मिळणार आहे.

## निवडक

### दुचाकीच्या धडकेत मुलगी जखमी

**पनवेल :** मोटरसायकलच्या धडकेमध्ये एक दहा वर्षीय मुलगी जखमी झाल्याची घटना कातकरवाडी येथे घडली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वावंजे येथील एका व्यक्तीची त्याच्या ताब्यातील युनिकॉन मोटरसायकल चालवताना रस्ता ओलांडणाऱ्या दहा वर्षीय मुक्ता हिला कातकरवाडी येथे ठोकर बसली. यात मुक्ता ही जखमी झाली. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कामोठ्यात हुक्का पार्लरवर कारवाई

**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील व्यंकट प्रेसिडन्सी हॉटेलमध्ये चालणाऱ्या हुक्का पार्लरवर कामोठे पोलिसांनी कारवाई करून तेथे वापरात येणारा हुक्का व इतर सिगारेट, तंबाखू उत्पादने ताब्यात घेण्यात आली आहेत. कामोठे वसाहतीमधील व्यंकट प्रेसिडन्सी हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरविरोधात व तेथे झालेल्या मारामारीसंदर्भात तक्रारी आल्याने पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकून हुक्का पार्लर मालक राजेंद्र तेली यांच्यासह तेथील मॅनेजर आणि तीन ग्राहक अश्या एकूण सहा जणांविरोधात कारवाई केली आहे. यासोबतच तेथे असलेले पॉटबेस, विविध प्रकारची फ्रुट फ्लेवर, मसाला फ्लेवर पाकीट व इतर साहित्य असा मिळून ५,१०० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

# भाजप सोशल मीडिया सेलची बैठक

## प्रभारी श्वेता शालिनी यांच्याकडून पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलची बैठक रविवारी (दि. ७) आयोजित करण्यात आली होती. भाजप महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलच्या प्रभारी श्वेता शालिनी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यात त्यांनी सोशल मीडिया सेलच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला तसेच त्यांच्या कामाचा आढावा घेत त्यांना मार्गदर्शन केले.

पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीवेळी प्रदेश चिटणीस चारुशीला घरत, भाजप उत्तर रायगड जिल्हा संयोजक प्रसाद मांडलेकर, ठाणे, कोकण विभाग संयोजक अभिजित पेडणेकर, जिल्हा सहसंयोजक सूर्यकांत गुप्ता, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, विनोद साबळे, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, सोशल मीडिया सेल प्रदेश सदस्या मोना अडवाणी, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, माजी नगरसेवक अजय बहिरा, सोशल मिडीया सेलचे प्रसाद हनुमंते यांच्यासह सोशल मीडिया सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.







(छाया : अक्षय शार्दुल)

## आजपासून वाशी ते पनवेल वातानुकूलित शिवनेरी सेवा

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या मुंबई विभागातर्फे सोमवार (दि. ८)पासून वाशी ते पनवेल मार्गावर वातानुकूलित शिवनेरी विनावाहक सेवा पनवेल आगारातर्फे सुरू करण्यात येत आहे. त्याचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल आगार प्रमुख सुजीत डोळस यांनी केले आहे.

उन्हाळी सुटीमुळे गावाला जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रवाश्यांची गर्दी झाली आहे. यामुळे प्रवाश्यांच्या सोयीसाठी सोमवारपासून वाशी ते पनवेल मार्गावर वातानुकूलित शिवनेरी विना वाहक सेवा पनवेल आगारातर्फे सुरू करण्यात येत आहे.

**गाड्यांच्या सुटण्याच्या वेळा**

| अ. क्र. | वाशी येथून | स्वारगेट येथून |
|---|---|---|
| १. | ६.१५ | १०.१५ |
| २. | ७.१५ | ११.४५ |
| ३. | १४.१५ | १८.४५ |
| ४. | १५.१५ | १९.४५ |



## करंजाडेमध्ये बुद्धविहारासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल शेजारी असलेल्या करंजाडे शहरात बुद्धविहारासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी बोधिसत्व फाउंडेशनने सरपंच मंगेश शेलार यांचेकडे निवेदन देऊन केली आहे.

पनवेल तालुक्यातील करंजाडे या गावाचे सिडको व नैनामुळे मोठ्या शहरात रूपांतर झाले आहे. मराठवाडा, विदर्भ, प. महाराष्ट्र व कोकणातून मोठ्या प्रमाणात नोकरी धंद्यासाठी आलेले नागरिक येथे स्थायिक झाले आहेत. बोधिसत्व फाउंडेशनतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब जयंती व तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. शुक्रवार (दि. ५) रोजी तथागत गौतम बुद्ध यांची जयंती बुद्ध पौर्णिमेला करंजाडे, येथे साजरी करण्यात आली. सरपंच मंगेश शेलार यांचे प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली. शहरवासीयांनी त्यांना लवकरात लवकर करंजाडे शहरात बुद्धविहारासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, असे निवेदन देऊन मागणी केली.

या वेळी ज्येष्ठ नागरिक श्यामराव बनसोडे, विश्राम शेडगे, दिलीप शेवडे, शिंगे तसेच अध्यक्ष धीरज बनसोडे, सचिव नितीन कोल्हे, खजिनदार विशाल शेडगे, सागर शिंदे, सुष्मा खराटे, कुंदा देव, धनराज ब्राम्हणे आदी उपस्थित होते.



## अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथून दुचाकीने चेंबूर येथे जाताना खाली पडलेली चप्पल घेण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या तरुणाला भरधाव टेम्पोने धडक दिल्याने मृत्यू झाला आहे. सायन-पनवेल मार्गावरील उरण फाटा येथील उड्डाण पुलावर ही घटना घडली असून सीबीडी पोलिसांनी फरारी टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनीत कुटुंबासह राहणारा अतीश कांबळे (वय २५) हा तरुण १ मे रोजी कामोठे येथील त्याचा मित्र राजू गोरे याच्या आईचा वाढदिवस साजरा करण्यासाठी आला होता. अतीश व त्याचा मित्र मनोज दोघेही रात्री चेंबूर येथून दुचाकीवरून कामोठे येथे गेले होते. या वेळी मित्राच्या आईचा वाढदिवस साजरा झाल्यानंतर पहाटे दीडच्या सुमारास दोघेही चेंबूरला जाण्यासाठी निघाले होते. याचदरम्यान पहाटे दोनच्या सुमारास सायन-पनवेल मार्गावरील उरण फाटा येथील उड्डाणपुलावर आले असताना पाठीमागे बसलेल्या अतीशची चप्पल रस्त्यावर पडली.

यामुळे उड्डाण पुलावर मोटरसायकल थांबवल्यानंतर चप्पल घेण्यासाठी पाठीमागे चालत असताना मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या टेम्पोची अतीशला समोरून जोरदार धडक बसली. या वेळी अतीशला नेरूळमधील डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## उरणमध्ये आमदार महेश बालदी यांच्या हस्ते लुपीन डायग्नोस्टिक्स लॅबचे उद्घाटन



**उरण : वार्ताहर**

भारतातील नामांकित लुपीन डायग्नोस्टिक्स लॅबच्या उरण केंद्राचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) उरण बालई रोड येथील प्राईम प्लाझा येथे करण्यात आले.

या वेळी भाजप उरण तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शहा, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, हितेश शहा, हस्तीमल मेहता, अजित भिंडे, अभय घरत, राजेश कोळी, डॉ. सुरेश पाटील, डॉ. मनोज भद्रे, डॉ. संजीव म्हात्रे, डॉ. उदय घरत, डॉ. घनश्याम पाटील, डॉ. विकास मोरे, डॉ. सत्या ठाकरे, डॉ. मंगेश डाके, डॉ. अजय कोळी, लुपीन डायग्नोस्टीक्सचे एरिया मॅनेजर संदेश बऱ्हाटे व उरणमधील अनेक नामांकित डॉक्टर व मान्यवर उपस्थित होते.

उरणमधील रुग्णांना अत्यंत उत्तम दर्जाची रक्त तपासणी सेवा देण्यासाठी हे केंद्र डॉ. आरती म्हात्रे व डॉ. हरिओम म्हात्रे यांनी उरण येथे चालू केले आहे. उरणच्या रूग्णांना सर्व प्रकारच्या रक्त, लघवी, थुंकी व विशेष रक्त तपासणी घरपोच सेवा उरणमध्ये योग्य दरांमध्ये उपलब्ध होणार आहेत. या लॅबमध्ये लवकरच मोफत रक्त तपासणी शिबिराचेही आयोजन होणार असल्याचे या वेळी डॉ. आरती म्हात्रे व डॉ. हरिओम म्हात्रे यांनी सांगितले.

## गव्हाण विद्यालयात स्व. जनार्दन भगत यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजकारण, राजकारण आणि शिक्षण यांचा त्रिवेणी संगम साधून जनमानसात अढळ स्थान निर्माण करणारा द्रष्टा नेता म्हणून पनवेल पंचक्रोशीत ज्यांची ख्याती आहे, असे स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेजचे मराठी विभागाचे प्रा. राजेंद्र चौधरी यांचे हस्ते भगतसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी ज्युनिअर कॉलेजच्या इतिहास विभागाचे प्रा. माणिकराव घरत, अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. अर्चना पाटील, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे आणि रयत सेवक दयानंद खारकर आदींनी स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.




**पनवेल : स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्त गव्हाण ग्रामपंचायत येथे अभिवादन करण्यात आले. या वेळी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, रोशन म्हात्रे, कामिनी कोळी, उषा देशमुख आदी उपस्थित होते.**



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्व. जनार्दन भगत यांची पुण्यतिथी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कर्मयोगी, कष्टकऱ्यांचे नेते व थोर समाज सुधारक दिवंगत जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३५व्या पुण्यतिथीनिमित्त खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात रविवारी (दि. ७) अभिवादन करण्यात आले.

स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी संत गाडगे महाराजांची प्रेरणा घेऊन त्यांनी स्वच्छतेची मोहीम हाती घेतली होती तसेच शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे व तळागाळातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे शिक्षण हे समाज सुधारकाचे साधन आहे, असे त्यांचे मत होते. शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचण्याचे व समाजामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे महान कार्य त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या पुण्यतिथीच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करून सर्वांनी आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाचे आयोजन नितीन वासकर (हेड क्लर्क) यांनी केले तसेच इतर शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## रामदास मंदिराचा १०७वा वर्धापन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील प्राचीन अशा दासमारुतीचा वर्धापन दिन झाला. यानिमित्ताने ह. भ. प. वर्षा सहस्रबुद्धे यांचे कीर्तन झाले. त्याना प्रकाश भारद्वाज यांनी संवादिनी तर योगेश गायकवाड यांनी तबलासाथ केली.



रामदास (मारुती) मंदिराची स्थापना शके १८३६ वैशाख वद्य प्रतिपदा इ.स.१९१६ साली झाली. तेव्हापासून आजपर्यंत विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. हनुमान जयंती, परशुराम जयंती, शंकराचार्य जयंती, संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा, संत नामदेव महाराज पुण्यतिथी, तुकाराम बीज ते नाथषष्ठी, अशा विविध संतांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त कीर्तन सोहळे होतात. दासनवमी उत्सव दहा दिवस होतो. या काळात काकडआरती, दासबोध वाचन, भिक्षा, महिलांचे विविध कार्यक्रम व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होतात. चातुर्मास व अधिक मासामध्ये प्रवचने वगैरे आध्यात्मिक कार्यक्रम होतात.

गेली १०७ वर्षे ही परंपरा अव्याहतपणे सुरू आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे धार येथील अण्णासाहेब फडके यांच्या संकल्पनेतून ही दासमारुतीची मूर्ती घडवण्यात आली असून या मुद्रेतील सुबक मूर्ती या परिसरात कोठेही नाही, अशी माहिती मंदिराचे विश्वस्त चंद्रशेखर खरे यांनी दिली.

## दुचाकीच्या धडकेत तरुणी जखमी; चालकावर गुन्हा

**पनवेल :** विचुंबे ब्रिजच्या सुरुवातीस एका दुचाकीची तरुणीला धडक बसली. या धडकेत तरुणी जखमी झाली आहे. दुचाकी चालकाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विचुंबे येथे राहणारी श्रद्धा अविनाश लांडगे ही विचुंबे येथे घरी जाण्यासाठी पायी पनवेल रेल्वे स्टेशनवरून विचुंबेकडे निघाली. ती विचुंबे ब्रिजच्या सुरुवातीला विचुंबे गावाकडून नवीन पनवेल साईटकडे जाणाऱ्या रोडवर आली असता, ड्यूक मोटरसायकल स्वाराची (एमएच ४६ सीजी ९८६५) तिला ठोकर बसली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



**उलवे नोड : भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली सेक्टर १९ येथे भाजप उरण विधानसभा मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे तसेच रफिक शेख, इब्राहिम पटेल, जाफर पठाण, वसिम खान, अकिल वरवंडे, मुस्ताक हचु, राजमुहमद यांनी हा मतदार नोंदणी कॅम्प आयोजित केला होता. त्याचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला.**

## कच्च्या कैऱ्यांना मागणी वाढली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बाजारात सध्या कच्चा कैऱ्यांची आवक वाढली असून लोणची व पन्हे याकरीता ग्राहकांची मागणीदेखील वाढत आहे.

बाजारात उन्हाळा सुरू होताच कच्च्या कैऱ्या बाजारात दाखल होण्यास सुरुवात होते. मेमध्ये कैऱ्यांची आवक वाढण्यास सुरुवात होते.

बाजारात निलम, तोतापुरी जातीच्या कैऱ्या विक्रीस आहेत. घाऊकमध्ये प्रतिकिलो २४-४० रुपये दर आहेत. तर किरकोळ बाजारात ६० ते ८० रुपयांनी विकिली जात आहे. महाराष्ट्र सहदक्षिण भारत, गुजरात मधून याची आवक होत असते. पूढील कलावधीत आणखीन आवक वाढेल, असे मत घाऊक व्यापारी यांनी व्यक्त केले आहे.

## पनवेलच्या लिमये वाचनालयात गुणवंत कामगारांचा सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात कामगार दिनाचे औचित्य साधून पनवेलमधील गुणवंत कामगारांचा सत्कार आयोजित केला होता.

या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी येथील शिरीष पाटील, देवराम भिसडे, पनवेल महापालिकेतील रवींद्र चोणकर, योगेश्वर पाटील, पोस्ट ऑफिसमधील रघुनाथ तांडेल, वैष्णवी पाटील, पनवेल शहर पोलीस ठाणे नवी मुंबई येथील धर्मेश म्हात्रे, सोनी बनसोडे या कर्मचाऱ्यांना संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता श्रीकांत जोशी यांनी सगळ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले.

संस्थेचे कार्यवाह काशिनाथ लक्ष्मण जाधव यांनी कामगार दिनाबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर, सहकार्यवाह जयश्री शेटे, कार्यकारिणी सदस्य सुनील खेडेकर, रमेश चव्हाण कोमसापचे अध्यक्ष रोहिदास पोटे, नागनाथ डोलारे, संस्थेच्या ग्रंथपाल निकेता शिंदे, लिपिक संपदा जोशी, सेवक संजय दिवटे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# दुटप्पी भूमिकेवर हल्लाबोल

केंद्रीय मंत्री नारायण राणे, राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर, शिवसेनेचे नेते रामदास कदम, संजय शिरसाठ, भाजपचे आमदार नितेश राणे, भाजपचे नेते प्रवीण दरेकर, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बारसूचे मैदान आरोप प्रत्यारोपांनी गाजवले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना हा प्रकल्प त्यांनीच आणला आणि बारसू हे ठिकाणदेखील त्यांनीच सुचवले. असे असताना या प्रकल्पाला विरोध का, असा सवाल उपस्थित करीत त्यांच्या दुटप्पी भूमिकेवरून त्यांच्यावर सर्वच विरोधकांनी जोरदार हल्ला चढविला.

**बारसूच्या मैदानात यायला उद्धव ठाकरेंना लाज वाटली पाहिजे. तुम्ही मुख्यमंत्री असताना हा प्रोजेक्ट तुम्हीच आणलात आणि बारसू हेदेखील तुम्हीच सुचवले आणि आता कुठलं काळ तोंड करून कातळशिल्प वाचवायला जात आहात. तुम्हाला थोडी शरम असती तर तिकडे गेला नसता, असा टोला उद्धव ठाकरे यांना शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी लगावला. हा माणूस किती विश्वासघातकी आहे हे फक्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच सांगू शकतील. त्यांचे मुख्यमंत्रीपद कसे घालवता येईल याच सुडाच्या भावनेने हा माणूस पेटला आहे, अशी जहरी टीकाही त्यांनी केली आहे. याशिवाय संजय शिरसाठ, आमदार नितेश राणे यांनीही उद्धव ठाकरे यांनी केलेल्या आरोपांवर हल्ला केला. बारसूमध्ये जर आता लाठीचार्ज किंवा गोळीबार झाला आणि त्यात कोणी शहीद झाले, तर उद्धव ठाकरे यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा ताबडतोब दाखल करा. या प्रकरणी आग लावायचे काम हेच करीत आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी ठाकरेंवर केला आहे. कोकणातील माणसांवर अन्याय आम्ही होऊच देणार नाही, कारण उद्धव ठाकरे यांनी कोकणातील नेत्यांना संपवण्याची सुपारी घेतली आहे. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनीही उद्धव ठाकरे यांचा चांगलाच समाचार घेतला, तर मी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना अभिनंदन करण्यासाठी मंत्रालयात गेलो तेव्हा तिथल्या स्टाफने सांगितले. साहेब यापूर्वीचे मुख्यमंत्री अडीच वर्षांत दोन वेळाच आले. जेमतेम तासभर बसायचे आणि जायचे आणि पेटवायला कुठे कधी फिरणार, कसे फिरणार? हॅलिकॉप्टरमधून मशाल घेऊन पेटवत जाणार की काय, अशा शब्दांत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंची खिल्ली उडवली. बारसुमध्ये जर आता लाठीचार्ज किंवा गोळीबार झाला आणि त्यात कोणी शहीद झाले तर उद्धव ठाकरे यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा ताबडतोब दाखल करा. या प्रकरणी आग लावायचे काम हेच करीत आहेत असा गंभीर आरोपही त्यांनी त्यांच्यावर केला आहे. उद्धव ठाकरेंच्या बारसू दौऱ्यावर शिक्षणमंत्री दीपक केसरकरांनीही टीका केली. उद्धव ठाकरे बारसूत विकासामध्ये अडथळा तयार करण्यासाठी जात आहेत. आधी स्वत: प्रकल्पासाठी पत्र देऊन ते आता विरोध करीत आहेत, असा केसरकरांनी ठाकरेंवर निशाणा साधला. सरतेशेवटी रत्नागिरी येथे झालेल्या सभेत उद्धव ठाकरे यांचे बंधू तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्यावर टीका केली. पक्ष नसलेल्या पक्षाचे अध्यक्ष येऊन गेले. आता सांगतात जी लोकांची भावना ती आमची भावना आहे. बाळासाहेबांच्या नावाने मुंबईचा महापौर बंगला जो ढापला तो लोकांना विचारून ढापला का? असा टोला राज यांनी लगावला. लोक निवडून देतात तेव्हा लोकांचे हित पाहिलेच पाहिजे. लोकांची काळजी घ्यायची असते, मात्र हे लोकं लोकांना फसवत आले, मूर्ख बनवत आले. ही माणसं कधी प्रदेशाची धूळधाण करतील हे समजणार नाही, असेही ते म्हणाले.**

# कर्जतचा सुमारे शंभर वर्षांपासूनचा मिरची बाजार

खबरबात — विजय मांडे



कर्जत बटाटावडा, पावसाळी पर्यटनासाठी धबधब्यांचे गाव आणि आता कर्जत शिक्षण पंढरीकडे वाटचाल करतेय त्याच बरोबर कर्जत मिरची बाजारासाठीही प्रसिद्ध आहे. रायगडच नव्हे तर ठाणे, पुणे, मुंबईहून सुद्धा या बाजारात वर्षानुवर्षे ग्राहक येतात आणि आपल्या आवडीची मिरची व खडे मसाले खरेदी करतात. विशेष म्हणजे परदेशात असलेल्या आपल्या नातेवाईकांना सुद्धा कर्जतची मिरची घेऊन तयार मसाला पाठवणारांची संख्याही लक्षणीय आहे. या मिरची बाजाराला शंभर वर्षे होत आली आहेत. यंदा मात्र ग्राहकांना मिरचीचा जोरदार ठसका बसला आहे. त्यामुळे गृहिणींनी मिरची खरेदी करताना हात आखडता घेतला आहे.

सुमारे नव्वद -पंच्याण्णव वर्षांपासून कर्जतचा मिरची बाजार भरतोय. महावीर पेठेत १०-१२ दुकानांमध्ये मिरची व खडे मसाले विक्रीसाठी असतात. ही मिरची हैदराबाद - वारंगल, आंध्रप्रदेश-गंटूर, तेलंगणा आदी राज्यातून पुण्यात येते आणि तेथून ती कर्जतच्या बाजारात उपलब्ध होते. हल्ली तयार मसाले मिळत असले तरी पहिल्यापासून ज्यांना कर्जतच्या मसाल्याची सवय आहे ते वर्षभरासाठी मसाला करण्यासाठी कर्जतची बाजारपेठ गाठतात. तसेच ग्रामीण भागात लग्न सोहळ्यासाठी भोजनाचा आस्वाद चांगला चाखायला मिळावा म्हणून वीस ते पंचवीस किलो मसाला करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. खरा हा बाजार चार ते पाच महिनेच असतो आणि सुमारे दोन कोटी रुपयांची उलाढाल होत असते.

जानेवारी ते मे या कालावधीत ही मिरची विकत घेण्यासाठी अगदी पेण, अलिबाग, पनवेल, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, मुरबाड, शहापूर, लोणावळा, पुणे येथूनच नव्हे तर मुंबईतूनही ग्राहक येत असतात. परदेशातही आपल्या नातेवाईकांना कर्जतमधून मिरची घेऊन मसाला तयार करून पाठवण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे. यंदा किंमतीच्या बाबतीत मिरची खूपच 'तिखट' झाली आहे परंतु तरीही मिरची व खडे मसाले घेण्यासाठी बहुतांश दुकानात ग्राहकांची गर्दी असते. मिरची सहा - सात प्रकारची असते. जयंतीलाल परमार, मदन परमार, शिवलाल गुप्ता हे तीन - चार पिढ्यांपासून हा मिरचीचा व्यापार करतात. काही छोटे व्यावसायिक हातगाडीवरही हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय हंगामात दोन कोटी रुपयां पर्यंत जातो.

कर्जतमध्ये मसाला दळण्याच्या मोजक्याच गिरण्या आहेत. तर तीन-चार ठिकाणी दणकी पद्धतीने मसाला कुटून दिला जातो. या पद्धतीच्या मसाल्याला चांगली चव असते. दहिवली, आमराई येथे या प्रकारच्या दणक्या आहेत. कर्जत व भिसेगाव येथे दगडेंची मसाला गिरणी प्रसिद्ध आहे. तर गुप्ता बंधूंची गिरणी सुद्धा बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. वांजळे व सावरगाव याच्या मधोमध ठाकरे यांची मसाला गिरणी आहे. त्या भागातील ग्रामस्थ तेथे मिरची, धणे, हळद करुन घेतात. काही मोक्याच्या गावात उदारणार्थ नेरळ, कडाव, कशेळे, कळंब आदी ठिकाणी सुद्धा मसाला गिरणी आहेत तर छोट्या गावांमध्ये सुद्धा मिरची दळून दिली जाते.

यंदा दीड-पावणे दोन पट मिरचीचे दर वाढल्याने अनेक गृहिणींनी मिरची विकत घेताना काटकसर केली आहे. खड्या मसाल्याचे दर स्थिर असल्याने थोदा दिलासा मिळाला आहे. दररोज जेवणात मसाला वापरावा लागत असल्याने नाईलाजाने मिरची खरेदी करण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. या मिरचीच्या दरामुळे गृहिणींचे आर्थिक गणित कोलमडले आहे. तर यंदा दरवर्षी पेक्षा पन्नास टक्केच व्यवसाय झाला आहे. असे व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे.



| मिरची (प्रति किलो) | गतवर्षी | यंदा |
|---|---|---|
| गंटूर मिरची | २२० रुपये | २८० रुपये |
| लवंगी मिरची | २२० रुपये | २८० रुपये |
| बेडगी मिरची | २८० - ४०० रुपये | ७०० रुपये |
| काश्मिरी मिरची | ४८० - ५०० रुपये | ८०० रुपये |
| संकेश्वरी मिरची | २४० - २६० रुपये | ४४० रुपये |
| पट्टी मिरची | २४० - २६० रुपये | ४०० रुपये |

खडे मसाले

| | |
|---|---|
| धणे | १८० - २०० रु. (प्रति किलो) |
| हळद | १२० - १८० रु. |
| बडीशेप | २८० रुपये |
| दालचिनी | ४०० रुपये |
| लवंग | ८०० रुपये |
| काळीमिरी | ८०० रुपये |
| जावंत्री | २८०० रुपये |
| नाकेश्वर | २४०० रुपये |



## बदलते तंत्रज्ञान

# 'मोटोरोला'ने लॉन्च केला नवीन स्मार्टफोन



मोटोरोला ही मोबाइल फोन्सची निर्मिती करणारी भारतातील लोकप्रिय कंपनी आहे. या कंपनीने त्यांच्या प्रोडक्ट रेंजमधील सर्वात दमदार फ्लॅगशिप फोन ' Edge Plus २०२३' जागतिक बाजारपेठेमध्ये अधिकृतरित्या लॉन्च केला आहे. हा फोन भारतामध्ये लॉन्च केला जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये मोटोरोलाच्या या स्मार्टफोनची किंमत भारतीय चलनानुसार ६५,००० हजार रुपये इतकी आहे. हा नवा फोन सॅमसंग, ॲप्पलच्या प्रीमियम फोन्सना टक्कर देऊ शकतो असे म्हटले जात आहे. विविध अत्याधुनिक फीचर्स असलेल्या या स्मार्टफोनमध्ये Stock android software बसवण्यात आले आहे. तसेच फोन खरेदी केल्यावर ४ वर्षांचा सिक्यूरिटी अपडेट देखील मिळतो.

मोटोरोलाच्या या नव्या स्मार्टफोनच्या मेटालिक बॉडीवर गोरिल्ला ग्लास लावण्यात आली आहे. वॉटर आणि डब प्रूफ असलेल्या हा फोन IP68 सर्टिफाइड आहे. याचे वजन 203g आहे. Motorola Edge Plus २०२३ सध्या फक्त काळ्या रंगामध्ये उपलब्ध आहे. लवकरच अन्य रंगांमधील मॉडेल्स देखील लॉन्च केले जाऊ शकतात. या फोनला ६.७ इंचाचा पोलेड डिस्प्ले आहे. हा फोन १० बिट पॅनल HDR10+ आणि डॉल्बी व्हिजन प्लेबॅकला सपोर्ट करतो. Motorola Edge Plus २०२३ मध्ये ६०MP सेल्फी कॅमेरा आहे. या कॅमेऱ्याद्वारे ४K मध्ये व्हिडियो रेकॉर्डिंग करता येते. या स्मार्टफोनमध्ये ५०MP मेन कॅमेरा जोडण्यात आला आहे. त्याशिवाय ऑटोफोकस १२MP कॅमेरा आणि ५०MP अल्ट्रावाइड कॅमेरा देखील आहे.Motorola Edge Plus २०२३ मधील प्रोसेसर आणि बॅटरी Qualcomm's top-shelf Snapdragon 8 Gen 2 processor हा प्रोसेसर मोटोरोलाच्या या फोनमध्ये बसवण्यात आला आहे. याला 8GB LPDR5X रॅम आणि ५१२GB स्टोरेज जोडण्यात येणार आहे. शिवाय ५१०० m-h इतकी क्षमता असलेल्या या फोनला बॅटरी बॅकअप देखील मिळणार आहे. हा फोन ६८W फास्ट वायर्ड आणि १५W वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करतो.

# जागतिक रेडक्रॉस दिन : स्वयंसेवी संघटना




विशेष

जगातील बहुतेक सर्व देशांत मानवतेची जोपासना करीत सेवाभावी कार्य करणारी स्वयंसेवी संघटना म्हणून 'रेडक्रॉस' परिचित आहे. ८ मे रोजी रेडक्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनाँटचा यांचा जन्मदिन होय. त्यांचा जन्म स्वित्झर्लडमधील जिनिव्हा येथे ८ मे १८२८ रोजी झाला. त्यांचा जन्मदिवस जागतिक 'रेडक्रॉस दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो.

रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपातकाळी सेवा देते. संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकलेले असलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते.

रेड क्रॉस मोहिमेस जन्म देणारे जीन हेनरी ड्यूनेन्ट यांचा जन्म ८ मे १८२८ रोजी झाला होता. त्यांचा जन्मदिनाला संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरे केले जाते. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयं सेवक दिन म्हणून देखील साजरे केले जाते. ही संस्था तब्बल १५० वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणी प्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली निःस्वार्थ सेवा देत आहेत.

भारतात वर्ष १९२० मध्ये पार्लियामेंट्री एक्टच्या अंतर्गत भारतीय रेडक्रॉस समितीचे गठन केले गेले. तेव्हापासून रेडक्रॉसचे स्वयं सेवक आपली निःस्वार्थ सेवाभाव करीत आहेत. विश्वाचे तब्बल २०० देश एकाच विचारांवर ठाम आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संस्था नैसर्गिक आपदा मध्ये अडकलेले लोकांना तसेच युद्धामध्ये घायाळ झाले असलेल्या वीरांना मदतीचा हात देऊन त्यांना यथोचित साहाय्य करतात.

रेडक्रॉस चा मुख्य उद्देश्य रुग्णाची, युद्धामध्ये घायाळ झालेल्या लोकांची सेवा करणे आहे. सन १९१९ पासून रेडक्रॉस मानवाचा त्रास कमी करण्या कडे विशेष लक्ष देत आहे. हेन्रीने सेवाकार्यासाठी या समितीला रेडक्रॉस नाव दिले. या समितीची ओळख पटण्यासाठी एका पांढऱ्या पट्टीवर लाल रंगाच्या क्रॉस चिन्हाला मान्य करण्यात आले. आता हे चिन्ह संपूर्ण विश्वाला मानवासाठी केलेली निःस्वार्थ सेवाभाव म्हणून ओळखले जाते.

सध्याच्या काळात १८६ देशांमध्ये रेडक्रॉस समिती कार्य करीत आहे. १९०१ साली हेनरी ड्यूनेन्ट यांना त्याचा सेवा भाव साठी पहिले नोबल शांती पारितोषिक देण्यात आले. विश्वाचे पहिले ब्लड बँक (रक्त पेढी) अमेरिकेमध्ये १९३७ साली उघडलेले गेले. आजच्या काळात जगातील जास्तीच जास्त ब्लड बँक (रक्त पेढी) रेडक्रॉस आणि त्यांचा सहयोगी संस्था राबवतात आहे. रेडक्रॉस संस्थेने राबवलेल्या जनजागृती मोहिमेमुळे हजारो लोकं थॅलेसेमिया, कर्करोग, आणि रक्ताल्पता (एनिमिया) सारख्या आजारापासून वाचत आहे.

क्लिक...क्लिक...!




**पनवेल : शहरातील गुणे हॉस्पिटलजवळील बाजारात रानमेव्याची आवक मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. मार्च, एप्रिल महिना सुरू झाल्यानंतर ओले काजूगर, काजूची फळे, पिकलेले आंबे, करवंदे, जांभूळ, कच्च्या कैऱ्या बाजारपेठेत विक्रीसाठी आल्या आहेत. यामध्ये सर्वात जास्त मागणी ओल्या काजूगारांना असल्याचे महिला व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.** (छाया : लक्ष्मण आडाव)

## आरोग्य प्रहर

# केस धुण्यासाठी गरम पाणी वापरावे

केस धुण्यासाठी गरम पाणी वापरणे अत्यंत हानीकारक ठरू शकते, कारण ते केसांचे निर्जलीकरण करते आणि त्यांना रुक्ष, कोरडे आणि कमकुवत करते. गरम पाण्यामुळे केसांची मुळेदेखील खराब होतात, त्यामुळे ते फुटतात. दुसरीकडे, थंड पाणी केसांसाठी सर्वोत्कृष्ट आहे, कारण ते केसांच्या मुळांना कोणत्याही प्रकारे नुकसान पोहचवत नाही आणि त्याऐवजी त्यांची देखभाल करते. थंड पाणी प्रत्येकासाठी सोयीस्कर नसल्यामुळे, ते कोमट वापरू शकतात. पण गरम पाणी नक्कीच वापरू नये.



केस गरम पाण्यानेच धुतले पाहिजेत. केस धुताना सुरुवातीला गरम किंवा कोमट पाणी वापरल्यास केसांची मुळे उघडतात. टाळू व केसांचा तेलकटपणा काढून टाकण्यासाठी शॅम्पू प्रभावीपणे काम करण्यास मदत करतात. पण शॅम्पू केल्यानंतर थंड किंवा साधे पाणी वापरणे आवश्यक असते जेणेकरून केसांवरील कंडिशनर किंवा हेअरमास्क व्यवस्थित धुतला जाईल आणि केसांच्या मुळांना पुन्हा बंद होण्यास मदत होईल त्यामुळे त्यांचा ओलावा टिकून राहील आणि रुक्षपणा कमी होईल आणि तुमच्या केसांना चांगली चमक येईल.

तेलकट केस रोज धुणे सुरक्षित आहे, त्यामुळे तुमच्या टाळूवरील बुरशीजन्य त्वचासंसर्ग कमी करतो. तसेच केसांमधील कोंडा कमी करतो पण जेव्हा तुम्ही तेलकट केस धुता तेव्हा पीएच बॅलन्स करणारा शॅम्पू व केसांच्या टोकांना कंडिशनर वापरणे अत्यंत आवश्यक आहे.

काही लोकांचे केस जन्मत:च कोरडे असतात तर काही लोकांचे केस रंगविल्यामुळे किंवा स्ट्रेटनिंग करण्यामुळे खराब होतात. कोरडे केस सल्फेट फ्री शॅम्पूने आठवड्यातून दोनदा धुतले पाहिजे. हा शॅम्पू केसांच्या नैसर्गिक तेलाचे संरक्षण करतो आणि केस आणखी कोरडे होणे टाळतो. केसांना शॅम्पू केल्यानंतर प्रत्येक वेळी हेअर मास्क वापरा, जो केसांना नैसर्गिक तेल पुरवितो आणि केसांना पोषण करण्यासाठी त्यांचा अर्क मागे सोडतो. कुरळ्या केसांना सुळसुळीत आणि हायड्रेट ठेवण्यासाठी खूप जास्त काळजी घ्यावी लागते. कुरळ्या केसांची व्यवस्थित काळजी न घेतल्यास केसांचा खूप गुंता होऊ शकतो आणि दिवसभर त्यांना सांभळणे कठीण होऊ शकते. कुरळ्या केसांना सौम्य सल्फेट फ्री शॅम्पूने आणि चांगला हायड्रेटिंग कंडिशनर वापरून आठवड्यातून दोन-तीन वेळा धुतले पाहिजे. कुरळ्या केसांना खूप ओलावा पुरविण्याची गरज असते.

# नेरळमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री चार ठिकाणी चोऱ्या, तर एक प्रयत्न फसला

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील कुंभार आळी भागातील जैन मंदिर आणि बाजूला असलेल्या इमारतीमधील बंद फ्लॅटमध्ये चोरीची घटना घडली. याच रात्री नेरळ पोलीस ठाणेसमोरील शैलेश नगर भागातील तीन बंगल्यांत घरफोडीची घटना घडली आहे.

नेरळ बाजारपेठ भागातील त्या बंद फ्लॅटमधून तब्बल चार लाख ७२ हजारांचा ऐवज लंपास झाला आहे. जैन मंदिरातील चोरीचा प्रयत्न मात्र फसला.



नेरळ पोलीस ठाणे हद्दीत कुंभार आळी भागातील श्री अंबा माता हॉल परिसरात असलेल्या श्री गणेश को. ऑप. हौसिंग सोसायटीमधील तळमजला प्लॅट नंबर चारमध्ये अज्ञात चोरट्यांनी बंद घराच्या दरवाजाची कडी तोडून कपाटातील लॉकर आणि डॉव्हरमध्ये ठेवलेले चार लाख ७२ हजाराचे दागिने लंपास केले. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे.

याच रात्री नेरळ पोलीस ठाणे समोरील देबाशिष या बंगल्याचे मालक मुंबई येथे राहतात. त्यामुळे चोरट्यांनी दरवाजाला लावलेले कुलूप तोडून बंगल्यात प्रवेश करून वरचा मजल्यावर असलेले कपाट तोडून त्यातील सामान अस्तव्यस्त केले, याच बंगल्याचे परिसरात आणखी दोन ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न केला, तर नेरळ बाजारपेठमधील जैन मंदिरातदेखील चोरी करण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला होता, मात्र हा प्रयत्न फसला.

# पोलादपूरमधील ज्वेलर्समध्ये चोरी

## पावणेदोन लाखांचा ऐवज लंपास; गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील उज्ज्वल ज्वेलर्स या दुकानातील सुमारे पावणेदोन लाखांचा ऐवज चोरी केल्याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी तीन संशयितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलादपूर शहरामध्ये गेल्या महिनाभरामध्ये तीन अज्ञात चोरट्यांनी नागरिकांसह पोलीस खात्याचीही झोप उडविली आहे. शिवाजीनगर येथील पाच-सहा दुकाने व घरांमध्ये चोरीच्या घटना एकाच रात्री घडल्यानंतर पोलादपूर एसटी बसस्थानकासमोर चोरी झाल्याचे आढळले होते. याप्रकरणी अज्ञात तीन चोरटे असल्याचे काही सीसीटीव्ही फुटेजमध्ये निष्पन्न झाले, मात्र या घटनांची गांभीर्याने नोंद होऊ शकली नव्हती.

उज्ज्वल ज्वेलर्स या गांधी चौकातील दुकानामध्ये शनिवारी (दि. ६) पहाटे सव्वापाच वाजण्याच्या सुमारास तीन व्यक्तींनी चार ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तारा, १.१५ लाख रु. किमतीच्या नाकातील चमकीच्या २० ग्रॅम वजनाची चार पाकिटे, १७ हजारांचे तीन ग्रॅम सोन्याचे मणी, १२ हजार रु. किमतीचे १७० ग्रॅम चांदीचे जोडवे, सहा हजार रु. किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे चांदीचे छल्ले, चार हजार रु. किमतीचे ८० ग्रॅम वजनाचे लहान मुलांच्या हातातील चांदीचे कडे असा एकूण एक लाख ७७ हजारांचा माल चोरट्यांनी लंपास केला. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलादपूर सहाय्यक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाईक नटे तपास करीत आहेत.

# भोगाव पार्टेवाडीत जर्सी गाय मृतावस्थेत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील भोगाव पाटवाडीतील एका शेतकऱ्याची गाय कातळी बंगला दत्तवाडीतील शिवारामध्ये मृतावस्थेत आढळली. या गायीवर बिबट्याने हल्ला केल्याचा संशय व्यक्त होत असून याबाबत पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांचा अहवाल मागवून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती वनपाल शाम गुजर यांनी दिली.

### बिबट्याच्या हल्ल्याचा संशय; नागरिक भयभीत

भोगाव पार्टेवाडीतील शेतकरी तुकाराम रावजी जाधव यांची गुरे नेहमीप्रमाणे चरायला गेली असता, त्यापैकी एक जर्सी गाय गोठ्यात परत न आल्याने त्यांनी शोधाशोध केली. त्यानंतर सकाळी कातळी बंगला दत्तवाडीतील जंगल भागात गाय मृतावस्थेत आढळली. या घटनेची माहिती मिळताच वनपाल श्याम गुजर आणि वनरक्षक प्रियंका जाधव यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या मृत जर्सी गायीच्या अंगावरील जखमा बिबट्याच्या हल्ल्यामुळे झाल्या आहेत अथवा कसे याबाबत तालुका पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अहवालही वनविभागाच्या परिमंडळाने मागविला असून याबाबतची वस्तूस्थिती उघड होईल, असे वनपाल गुजर यांनी स्पष्ट केले आहे.

लोकांनी अफवा पसरवूही नयेत तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे त्यांनी केले आहे.

# नियमभंगप्रकरणी वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि. ६) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १२८ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

या वाहनचालकांकडून पोलिसांनी ९४ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

# पर्यटकांच्या गर्दीने ठिकठिकाणी वाहतूक कोंडी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सुटीचा हंगाम सुरू झाल्याने मोठ्या संख्येने पर्यटक अलिबाग, नागाव, किहीमला जाण्यासाठी गर्दी करीत आहेत. यामुळे अलिबाग शहरासह अलिबाग-पोयनाड, रेवदंडा या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यात लग्नसराई सुरू असल्याने वाहनांच्या संख्येत आणखीनच भर पडत आहे.

एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच पर्यटक मोठ्या संख्येने अलिबागतध्ये दाखल होत आहेत. येथील अलिबागसह नागाव, रेवदंडा, किहीम, आवास येथील समुद्रकिनारी जाण्यासाठी अनेक जण आपल्या खासगी वाहनांमधून येत आहेत. त्यामुळे पोयनाड-पेझारीपासूनच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच लग्नसराई असल्याने खासगी बस, चारचाकींची गर्दी रस्त्यावर होत आहे. कार्लेखिंड, पोयनाड, पेझारी रस्त्याच्या कडेला आंबा विक्रेते बसत असल्याने वाहतूक कोंडीत आणखीनच भर पडत आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

# अलिबागच्या बाजारात रत्नागिरीचा हापूस विक्रीला



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन महिन्यांपासून अलिबागच्या बाजारात रत्नागिरीचा आंबा दाखल झाल्याचे चित्र असून चार डझनप्रमाणे एक पेटी १५०० ते १६०० रुपयांनी विकली जात आहे, मात्र अलिबागचा आंबा अद्यापही ग्राहकांपासून दूरच असल्याचे दिसत आहे.

जानेवारी महिना संपल्यांवर अनेकांना आंब्याचे वेध लागतात. अलिबागसह वेगवेगळ्या ठिकाणी आंबा विक्रीची दुकाने दोन महिन्यांपासून सजली आहेत. नाक्यानाक्यावर व एसटी बसस्थानक भाजीमार्केट व रस्त्यांच्या दुतर्फा आंबे विक्रीसाठी ठेवली जात आहेत. समुद्रकिनारी फिरण्यासाठी येणारे पर्यटक आंबा खरेदीकडे अधिक भर देत आहेत. अनेक वेळा दिवसाला ४० आंब्याच्या पेट्या विकल्या जात असल्याची माहिती विक्रेत्यांकडून दिली जात आहे. सध्या काही ठिकाणी आंब्याच्या आकारानुसार २५० ते ४०० रुपये डझनने आंबा विकला जात आहे. बदलत्या वातावरणामुळे रायगड जिल्ह्यातील आंबा बाजारात अद्याप दाखल झाला नाही. त्यामुळे रत्नागिरीतील आंबा अलिबागच्या बाजारात विक्रीसाठी ठेवला जात आहे.

# महाडमध्ये आगीत दुकान खाक

**महाड : रामप्रहर वृत्त**

शहरातील नवी पेठ परिसरात असलेल्या राडाजी नॉव्हेल्टीज दुकानाला शनिवारी (दि. ७) रात्री अचानक आग लागली. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. आगीत व्यापाऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

नवी पेठमधील राडाजी नॉव्हेल्टीज दुकान रात्री आठ वाजता बंद केल्यानंतर साधारण दहा वाजता दुकानाला भीषण आग लागली. त्यामुळे दुकानातील फर्निचर, विजेची साधने आणि दुकानातील सर्व सामान खाक झाले. दुकानातून धूर येत असल्याचे लक्षात येताच, महाड नगरपालिकेच्या अग्निशमन यंत्रणेला कळविण्यात आले. महाड नगरपालिका आपत्ती विभागाचे प्रमुख गणेश पाटील तसेच इतर सहकाऱ्यांनी व पालिकेच्या अग्निशमन यंत्रणेने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सुमारे तासाभरानंतर आग आटोक्यात आली. सुदैवाने लगतच्या घरांचे आगीमुळे कोणतेही नुकसान झाले नाही.

# खोपोलीच्या बी. एल. पाटील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील बी. एल. पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालयातील वर्षभरात विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण आणि निरोप समारंभ सोहळा शनिवारी (दि. ६) उत्साहात झाला. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक आणि पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सीईओ अरिहंत ग्रुपचे डायरेक्ट गॅरी खन्ना, बांधकाम व्यावसायिक कौशिक पटेल, केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाहक किशोर पाटील, बी. एल. पाटील तंत्रनिकेतनचे गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष राजू ठक्कर, सदस्य दिलीप पोरवाल, अबूशेठ जळगांवकर, चंद्रकांत केदारी आदी उपस्थित होते. प्राचार्य प्रशांत माने यांनी मान्यवरांचे स्वागत करीत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

सीईओ गॅरी खन्ना यांनी, विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर करिअर घडविण्यासाठी आमची संस्था मदत करेल. त्यासाठीचे प्रशिक्षण शिबिर केटीएस मंडळ आणि आमच्या संस्थेच्या माध्यमातून ठेवणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अविनाश मोरे यांनी तर अभार प्रा. शिवाजी मुरादे यांनी मानले.



(छाया : जयवंत माडपे)

# कंत्राटी कामगारांची प्रत्येक पोलीस ठाण्यात नोंद करण्याची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात औद्योगिक वसाहतीत किंवा ग्रामीण भागात बाहेरील राज्यातून कामासाठी आलेल्या सर्व कंत्राटी कामगारांच्या ओळखपत्राची पोलीस ठाण्यात नोंद करून घेण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून करण्यात येत आहे.

खालापूर तालुका हा औद्योगिक प्रगतीकडे वाटचाल सुरू असलेला तालुका असून खोपोली, पाताळगंगा, साजगाव, ढेकु, सावरोली, माडप, तांबाटी, पेण-खोपोली रस्त्याच्या आजूबाजूला अशा अनेक ठिकाणी औद्योगिक वसाहती असून याच्याच बरोबरीने ग्रामीण भागात घरकूल बांधणी प्रकल्प सुरू झाले आहेत. या परिसरात विविध ठिकाणी मोठ्या संख्येने परप्रांतीय काम करीत आहेत. त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने अनधिकृतपणे भंगार गोळा करणाऱ्या परप्रांतीय व्यावसायिकांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे या अनधिकृत भंगार डेपोमुळे नागरिकांना धोका संभवतो. अनेकदा झालेल्या भांडणे, चोरीच्या घटनांमध्ये हे परप्रांतीय कामगार असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या कामगारांची नोंद पोलीस ठाण्यात करण्याची मागणी स्थानिकांमधून होत आहे.


## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसिद्वारे असे सूचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **१) श्री.लक्ष्मण मऱ्या कोळी. २) श्री.देवेंद्र लक्ष्मण कोळी व ३) श्रीमती प्रेमा रमेश कावळे,** रा. गणेशपुरी, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरिता ''भुखंड क्र. २१४ ए, क्षेत्रफळ २६० चौ.मी., से.२५ ए, पुष्पक-वहाळ नोड नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड'' या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **मे. एम. के. इन्फ्रा तर्फे भागिदार १) श्री. मोहम्मद गौस काश्मिरी व २) श्रीमती कौसर जान काश्मिरी** कार्यालयीन पत्ता – से.४४, सिवुडस, नेरुळ, नवी मुंबई यांना विकसित करण्यासाठी दिलेला आहे. सदर भुखंडामधील माझ्या अशिलांच्या हिश्श्याचा भुखंड ते त्यांच्या नावे खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे / त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ ए | २१४ ए | २६०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

कार्यालय :- तळ मजला, प्लॉट नं. बी-४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई-४००७०६. मो.९३२४५६९८०६.



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १०/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग रिजन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. अलिबाग येथील एमआयडीसी कॉलनीतील वर्ग -४ ची निवासी इमारत, ईएसआर व पोयनाड वॉटर वर्क्स येथील वर्ग -३ ची निवासी इमारत पाडणे. (दुसरी मागणी) | ₹ ५,१५,०००.०० |
| २. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या कडेची बांधीव गटर्स, मोऱ्या, उघडे खोदलेल्या गटांराची पावासाळ्या पूर्वी व पावसाळ्या दरम्यान साफसफाई करणे. (दुसरी मागणी) | ₹ ४०,३१,१३५.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०८/०५/२०२३ ते दिनांक १७/०५/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक १०/०५/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १२/०५/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ११/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग रिजन व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पेण अलिबाग रिजन व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेच्या विविध ठिकाणी स्तर निर्देशकाचा (Level Indicator) पुरवठा करणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ २४,९२,२००.०० |
| २. | पेण अलिबाग रिजन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पोयनाड येथील जलशुद्धीकरण केंद्र व शुद्धजल उदंचन गृहातील अंतर्गत आणि बाह्य प्रकाश व्यवस्था सुधारणे आणि मजबूत करणे. | ₹ ३९,२३,४४०.०० |
| ३. | पेण अलिबाग रिजन व नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. दोन कॅलेंडर वर्षांसाठी नागोठणे आणि पोयनाड येथील डिझेलवर चालणाऱ्या जनरेटिंग सेटची मासिक सर्व्हिसिंग, किरकोळ बिघाड आणि नियतकालिक प्रतिबंधात्मक देखभाल करणे. | ₹ २१,५६,५६८.०० |
| ४. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतींची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र इमारत, लॉन व अग्निशमन केंद्र परिसराची दैनंदिन देखभाल करणे. | ₹ २२,२१,८७४.०० |
| ५. | विळेभागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नवीन सीएलएफचे उच्च शक्ती संरक्षणात्मक इएसएम आधारित उपचारांसह स्ट्रक्चरल मजबुतीकरण करणे. | ₹ ४०,३४,९७५.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०८/०५/२०२३ ते दिनांक २२/०५/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ११/०५/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/०५/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नागरिकांच्या सहकार्याने विकास करणार

## ■ आमदार मंदा म्हात्रे यांचे वाशीत प्रतिपादन
## ■ महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून वाशी सेक्टर १ मधील साईबाबा मंदिरांच्या बाजूला मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ५३५ नागरिकांनी लाभ घेतला. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी नागरिकांच्या सहकार्याने वाशी शहराचा विकास करणे सोपे होईल, असे मत व्यक्त केले.

भाजप महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष विकास सोरटे, ज्येष्ठ समाजसेवक जेम्स आवारे यांच्या वतीने मोफत महाआरोग्य शिबिर यशस्वी करण्यात आले. भाजप यांच्या सौजन्याने या मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लॉयन्स कल्ब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स यांच्या सहकार्याने तसेच मयुरेश हॉस्पिटल तुर्भे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपा महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष विकास सोरटे, ज्येष्ठ समाजसेविक जेम्स आवारे, पंचशीला तूपसमुद्रे, निधी भाटीया, आशा बाविस्कर, लक्ष्मी देवकर, विजया साळवे, अनिता शिंदे, वर्षा झरेकर, अस्मिता सावंत, वैशाली सावंत, संगीता चिकणे, राजा देवकर, संदेश साळवे, सन्नी सोनावणे, कुणाल चिकणे, लॉयन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स अध्यक्ष प्रताप मुधलियार, डॉ अनिकेत सोनावणे, संदीप सुर्यवंशी, रिना अग्रवाल, मोहन कालबेरे तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, आज वाशी से-१ येथे भारतीय जनता पक्ष व लॉयन्स कल्ब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्स व मयुरेश हॉस्पिटल तुर्भे यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांचा उदंड प्रतिसाद पाहून समाधान वाटत आहे. वाशी येथील माझे अनेक सहकारी यांच्या सहकार्याने या महाआरोग्य शिबिर होत आहे. वाशी येथील नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळावी, त्यांना मोफत औषधे उपलब्ध व्हावी, हा यामागचा उद्देश असून आज मोठ्या संख्येने सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग शिबिराचा लाभ घेत आहेत, वाशी येथील नागरिकांनी अशाच रीतीने सहकार्य केल्यास लवकरच वाशी शहराचा विकास करणे सोपे होईल, असे मत आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केले.

**५३५ नागरिकांनी घेतला लाभ**

शिबिरामध्ये रक्तदाब, डायबिटीस, बीएमआय, ईसीजी, डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आयुर्वेदिक डॉक्टरांचा सल्ला, मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच मोफत औषधे, डाबर च्यवनप्राश व मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ५३५ नागरिकांनी लाभ घेतला.

# बेशिस्त रिक्षाचालकांविरोधात तक्रार करण्याचे आरटीओकडून आवाहन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

मीटरप्रमाणे रिक्षाचे भाडे नाकारणे, जवळचे भाडे नाकारत प्रवाशांना वेठीस धरण्याचे प्रकार पनवेल परिसरात होत आहेत. या विरोधात अनेकदा सामाजिक संघटनांनी आंदोलनेदेखील केली आहेत. त्यामुळे रिक्षाचालकांच्या या मनमानी कारभाराविरोधात तक्रार असल्यास आता थेट पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी (आरटीओ) संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**येथे करा संपर्क**

**पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ११२ क्रमांक तसेच पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने ९००४६७०१४६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

खारघर शहरात तळोजा आणि खारघर परिसरातील जवळपास एक हजार रिक्षाचालक व्यवसाय करीत आहेत. प्रादेशिक परिवहन विभागाकडून या रिक्षाचालकांना मीटरप्रमाणे दर ठरवण्यात आले आहे, मात्र खारघर रेल्वेस्थानकावरून बहुतांश वेळा रिक्षाचालकाजवळचे भाडे नाकारत असल्याच्या तक्रारी होत आहेत. सेक्टर ३० ते ३५ आणि तळोजा वसाहतीमधील काही रिक्षा स्थानकावर असे प्रकार सर्रासपण होत आहेत. याशिवाय प्रवाशांसोबत उद्धट वर्तन करणे, गणवेश परिधान न करणे असे प्रकारदेखील नियमितपणे घडत असल्याने पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाने प्रवाशांना तक्रार करण्यासाठी संपर्काचे आवाहन केले आहे. त्यामुळे पनवेल परिसरातील रिक्षाचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# सीवूड्स येथे शाळा इमारतीच्या बांधकामाचे काम मंजुरीनंतर सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

२०१९च्या महासभेत माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी सीवूड्स सेक्टर ५० जुने येथील भूखंडावर शाळा इमारत बनवा, अशी मागणी केली होती. ती मागणी पूर्ण होऊन सेक्टर ५० जुने भूखंड क्रमांक १३वर शिक्षण विभागाने दिलेल्या गरजेनुसार वर्गखोल्यांच्या मागणीच्या अनुषंगाने दोन मजली इमारतीच्या बांधकामाचे काम मंजूर झाले झालेले आहे. या ठिकाणी आता बांधकाम सुरू आहे.

लोकांच्या मागणीनुसार प्रशासनाला अखंडित इमारत बनवा याकरिता अनेकदा निवेदन करण्यात आले होते. अखेर पालिकेने ही मागणी मान्य करून या ठिकाणी संपूर्ण दहावी बारावीपर्यंत शिक्षण घेता येईल या पद्धतीने इमारत बांधली जाणार आहे. विशाल डोळस यांच्या मागणीला यश आले आहे.

आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीत आयुक्तांसोबत बैठक पार पडली होती. या वेळी सीवूड्स येथील माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी आक्रमकपणे शाळेच्या इमारतीबाबत भूमिका मांडली होती. सध्या सीबीएसई शाळांना वाढता प्रतिसाद बघता शाळेची क्षमता वाढवणे गरजेचे आहे, मात्र पालिकेकडून टप्प्याटप्प्यात इमारत उभारण्याचे प्रस्ताव पुढे केले जात आहेत. याला जोरदार आक्षेप घेत डोळस यांनी गरजेनुसार बांधकाम केल्यास किती अडचणींना सामोरे जावे लागेल याबाबत आयुक्तांना सविस्तर माहिती दिली. तसेच शाळा सुरू असताना इमारतींचे काम कसे केले जाणार? त्याची पर्यायी व्यवस्था आहे का? त्यामुळे सर्वसमावेशक पद्धतीने शाळेचे काम पूर्ण करावे, जेणेकरून भविष्यात कसलीही अडचण निर्माण होणार नाही, असे डोळस यांनी आयुक्तांच्या लक्षात आणून दिले.

आयुक्तांनीदेखील गांभीर्याने घेत त्याबाबत सकारात्मकता दाखवली असून प्रस्ताव त्वरित बनविण्याचे आदेश दिले आहेत.

# एपीएमसी परिसरात जबरी चोरी करणारा आरोपी जेरबंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एपीएमसी पोलिसांनी मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीला जेरबंद केले असून दिपेश हिरानाथ पवार, (वय १९, रा. डोंबिवली, ठाणे) असे त्याचे नाव आहे.

गेल्या काही दिवसात एपीएमसी परिसरात जबरी चोरीचे प्रमाणात वाढ झाली होती. त्या अनुषंगाने एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक तन्वीर शेख यांनी विशेष पथक तयार करून जबरी चोरी प्रकरणांचा तपास सुरू करण्याचे निर्देश दिले होते. हा तपास करताना गुन्हे स्थळांचा तांत्रिक तपास केला असता दिपेश पवार या संशयित आरोपीस सुरुवातीला ताब्यात घेतले. पोलिसी पद्धतीने चौकशी केली असता त्याने ए.पी.एम.सी, वाशी, कोपरखैरणे, तुर्भे पोलीस ठाणे क्षेत्रात केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीकडून १३ हजार ९९९चा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. आरोपीने असेच अनेक गुन्हे केल्याचा अंदाज पोलिसांना आहे. याबाबत तपास सुरू आहे

# नेरूळमध्ये छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज यांचे १००वे पुण्यस्मरण असल्याने स्वराज्य संघटना नवी मुंबईच्या वतीने शनिवारी (दि. ६) नेरूळमध्ये छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शाहू महाराजांचे कार्य हे प्रत्येक घराघरात पोहचवावे हया उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजानी स्थापन केलेले स्वराज्य खऱ्या अर्थाने शाहू महाराजानी सुराज्य करून दाखवले, अशी संपूर्ण छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनाबाबत माहिती स्वराज्य संघटनेचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष स्वप्निल घोलप यांनी दिली.

या वेळी स्वराज्य संघटना महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अंकुश कदम, राज्य कार्यकारिणी सदस्य राहुल गावडे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष उमेश जुंघरे, जिल्हा उपाध्यक्ष स्वप्निल घोलप, तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



# पकडलेल्या चोराचा पोलिसावर हल्ला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

इमारतीत घुसलेल्या चोरट्याला रहिवाशांनी पकडल्यानंतर त्या चोरट्याने पोलिसालाच चावा घेण्याची घटना बेलापूर गावात घडली. या प्रकारात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला असून एनआरआय पोलिसांनी याप्रकरणी महमद आसिफ मकसूद अन्सारीला (वय २५) अटक केली आहे.

बेलापूर सेक्टर २० मधील स्नेहसदन सोसायटीच्या आवारात चोरीच्या उद्देशाने घुसलेल्या महमद आसिफ मकसूद अन्सारी या तरुणाला सोसायटीतील रहिवाशांनी पकडून एनआरआय पोलिसांच्या ताब्यात दिले होते. या वेळी एनआरआय पोलीस ठाण्यातील गस्ती पथकाकडून या तरुणांची चौकशी सुरू असताना त्याने पोलिसांना शिवीगाळ केली. या वेळी गस्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांपैकी सहायक पोलीस निरीक्षक गणेश जाधव यांच्यासह पोलीस शिपाई जांभोरे त्या ठिकाणी आले होते.

या वेळी जाधव यांनी तरुणाला समजावण्याचा प्रयत्न केला, पण त्याने त्यांच्या चेहऱ्यावर ठोसा मारला. तसेच पोलीस शिपाई जांभोरे यांची छाती, मनगटावर चावा घेतला.

# जुईनगरमध्ये गौतम बुद्ध जयंती महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रबुद्ध सेवा संघ, जुईनगर; आम्रपाली महिला मंडळ, जुईनगर व महानाग साक्यमुनी विजासन, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध जयंती महोत्सव शुक्रवारी (दि. ५) बुद्ध पौर्णिमेच्या मंगल व पवित्र दिनी पारंपरिक बौद्ध पद्धतीने नवी मुंबईतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, जुईनगर येथे साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम दोन सत्रांमध्ये घेण्यात आला असून प्रथम सत्रामध्ये धम्म ध्वजारोहण, बुद्ध पूजा, पूज्य भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांच्याकडून अष्टशील उपोसथ ग्रहण करण्यात आले. त्यानंतर हँडरर सामूहिक न्याहारी, सामूहिक साधना झाली व त्यानंतर भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांनी आदर्श बौद्ध समाज निर्मिती या विषयावर धम्मदेसना दिली आणि कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात सायंकाळी भदंत विमलकीर्ती गुणसिरी यांनी बुद्ध धम्मावर धम्मदेसना दिली. या कार्यक्रमास मुंबई नवी मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यातील बौद्ध अनुयायिनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. बौद्ध धर्माच्या पद्धतीने नवी मुंबईत प्रथमच असा कार्यक्रम घेण्यात आला.

जयंती महोत्सव यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष विनायक यादव, सचिव विलास भोळे, सुनिल पाटोळे, चंद्रकांत सोनावणे, जयश्री कापडणे, साधना जाधव आदींनी मेहनत घेतले.





### लोककला महोत्सवात महाराष्ट्राचे नाव उज्वल

# उरणमधील दत्ता भोईर यांच्या समुहाचा आज चेन्नईत डंका



**उरण : वार्ताहर**

कर्नाटकमध्ये साजरा करण्यात आलेल्या लोककला महोत्सवात सत्याने तीन वेळा बेस्ट परफॉर्मन्स हा किताब मिळवून हॅटट्रिक साधून उरणच्या दत्ता भोईर आणि त्यांच्या समुहाने महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल केले होते. आणि त्याच्या पाठोपाठ त्यांना महाराष्ट्र राज्याच्या वतीने पुन्हा एकदा सोमवारी (दि. ८) चेन्नई येथे होत असलेल्या लोककला महोत्सवात कोळी व लावणी नृत्याविष्कार सादर करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर, सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून हे निमंत्रण देण्यात आले आहे. दत्ता भोईर यांनी आज पर्यंत पारंपारिक कोळीनृत्य, महाराष्ट्राची ठसकेबाज लावणी, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने देशाच्यास्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा गाथा स्वातंत्र्याची (एक संगित महापर्व), वासुदेव बळवंत फडके जयंती सोहळा, नवरीचे मांडवान, रंगान रंगलाय कोळीवाडा, राजापंढरीचा, नाखवा माझा दर्याचा राजा असे अनेक दर्जेदार कार्यक्रम सादर केले आहेत.

कर्नाटक उडपी येथे दक्षिण कन्नडा मोगविरा महासंघ उडपी यांच्या वतीने २०२२ मध्ये जों महालक्ष्मी उत्सव साजरा झाला होता त्यावेळी उपस्थित कर्नाटकचे मुख्यमंत्री बसराज बोम्मईयांनी यांनी या ठिकाणी लोककला सादर करण्यासाठी भारतातून ज्या २५ राज्यांनी आपल्या लोककला सादर केल्या होत्या त्यामध्ये महाराष्ट्राने सादर केलेल्या कोळी व लावणी नृत्याविष्कार हा सर्वात बेस्ट परफॉर्मन्स आल्याचे सांगून दत्ताभोईर आणि त्यांच्या आई एकवीरा सांस्कृतिक कला मंचच्या कलाकारंचे अभिनंदन केले होते.

आज पुन्हा एकदा दत्ता भोईर आणि त्यांच्या कलाकार समूहाला महाराष्ट्र राज्याच्या वतीने येत्या ८ मे २०२३ रोजी चेन्नई येथे होत असलेल्या लोककला महोत्सवात कोळी व लावणी नृत्याविष्कार सादर करण्यासाठी निमंत्रित केले आहे.

# लग्नाचे प्रलोभन दाखवून लैंगिक अत्याचार

**नवी मुंबई :** महिला डॉक्टरला लग्नाचे प्रलोभन दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वाशी पोलिसांनी वाशी, सेक्टर ९ मध्ये राहणाऱ्या मुकुंद गडदे याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

मुकुंद हा मुंबईत शासकीय कार्यालयात कामाला आहे तर ३८ वर्षीय पीडित महिला मुंबई महापालिकेतील आरोग्य केंद्रात डॉक्टर म्हणून कार्यरत आहे. पीडित महिला काही वर्षांपूर्वी पतीपासून विभक्त झाली असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा मुकुंद हादेखील आपल्या पत्नीपासून विभक्त राहतो. लग्न जुळविणाऱ्या साईटवरून वर्षभरापूर्वी या दोघांची ओळख झाली होती. त्यानंतर या दोघांमध्ये मैत्री झाल्यानंतर मुकुंदने पीडितेला लग्नाचे प्रलोभन दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मुकुंदने लग्नाला नकार दिल्यामुळे महिला डॉक्टरने वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून मुकुंदवर बलात्काराचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.






## निवडक

### पोलीस मुख्यालयात शस्त्र प्रदर्शन

**रेवदंडा :** रायगडचा युवक फाउंडेशनच्या चला मामाच्या गावाला जाऊया या शिबिरांतर्गत अलिबाग तालुक्यातील इ. पाचवी ते १२वीपर्यंतच्या मुलामुलींमध्ये देशसेवेचे प्रेम निर्माण व्हावे, या उद्देशाने रायगड पोलिसांच्या सौजन्याने सोमवारी (दि. ८) पोलीस मुख्यालयात जंजिरा सभागृहात शस्त्रांची माहिती व प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यासाठी मुलामुलांनी आपले शाळा, कॉलेजचे ओळखपत्राची झेरॉक्स व मोबाईल क्रमांक देऊन चेंढरे येथील घरत झेरॉक्स सेंटर येथे नोंदवावी, असे आवाहन रायगड भूषण जयपाल पाटील यांनी केले आहे.

### माथेरानमध्ये रंगणार अश्वशर्यती

**माथेरान :** माथेरानच्या मातीत वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रिडा संकुलात याही वर्षी क्रीडाप्रेमींना, पर्यटकांना त्याचप्रमाणे स्थानिक नागरिक, आदिवासी बांधवांना अश्वशर्यतींचा थरार २० आणि २१ मे रोजी पहावयास मिळणार आहे. यासाठी माथेरान युथ सोशल क्लबचे संस्थापक प्रदीप दिवाडकर यांचे सुपुत्र माथेरान युथ सोशल क्लबचे अध्यक्ष प्रशाम प्रदीप दिवाडकर यांनी अश्वशर्यतींचे आयोजन केले आहे. यामध्ये ट्रॉटिंग रेस, भाला रेस, बॉल अँड बकेट, रिले रेस तसेच अन्य शर्यतींचा समावेश आहे.

# मुरूडच्या विकासाचा शब्द पूर्ण

- आमदार महेंद्र दळवी यांचे प्रतिपादन
- विविध विकासकामांचे लोकार्पण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराच्या सर्वांगिण विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे कोट्यवधींचा निधी प्राप्त केला असून विकासकामांना आणखी निधी लागल्यास तो मी आणणार आहे. सर्व विकासकामे झटपट पूर्ण करण्याचे काम हे प्रशासक भुसे करीत आहेत. मुरूडचा कायापालट करण्यात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. मी आमदार झाल्यावर शहराच्या विकासाठी जो शब्द दिला होता तो आता पूर्ण होताना मला आनंद होत आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले. ते नगर परिषदेने पूर्ण केलेल्या विकासकामांचे लोकार्पण करताना बोलत होते.



या वेळी मुख्याधिकारी व प्रशासक पंकज भुसे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, अशोक धुमाळ, माजी नगरसेविका युगा ठाकूर, मेघाली पाटील, गिरीश साळी, उस्मान रोहेकर, सागर चौलकर, माजी उपनगराध्यक्ष निलोफर दरोगे, दिनेश मिणमिणे, महेश पाटील, महेश भगत, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शहरप्रमुख संदीप पाटील, समाज सेवक अरविंद गायकर, श्रीकांत सुर्वे, पांडुरंग आरेकर आदी उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते जकात नाका ते मायनाक यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे व जलवितरण नलिका टाकणे, नेताजी सुभाषचंद्र बोस (शेगवाडा) रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, घरटकर रस्ता काँक्रिटीकरण करणे, शिंद्री गल्ली रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करणे, दामाद कॉलनी व स्वामी समर्थ इमारतीपर्यंत रस्ता काँक्रिटीकरण करणे व जलवितरण नलिका टाकणे, दस्तुरी नाका काँक्रिटीकरण करणे, नगरपरिषद हद्दीमधील सीकेपी समाज हॉलचे लोकार्पण, सिद्धीबाग विकसित करणे, कोळीवाडा येथील पिंडदान शेडचे बांधकाम, बोटहाऊस येथे सार्वजनिक शौचालय बांधणे, शहरातील विविध ठिकाणी पथदिवे व हायमास्ट दिवे बसवणे आदी विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले.

आमदार दळवी पुढे म्हणाले की, शहराच्या विकासासाठी एवढा मोठा निधी कधी प्राप्त झाला नव्हता. लवकरच समुद्रकिनारा सुशोभिकरणाचे कामसुद्धा सुरू होणार आहे.

# पालीत लांडोरचा मुक्त संचार; बघ्यांची गर्दी

**पाली : रामप्रहर वृत्त**

पाली शहरामध्ये एक लांडोर रविवारी (दि. ७) मुक्त संचार करताना आढळून आली आहे. त्यामुळे पालीकरांमध्ये कोतवाल निर्माण झाले असून सर्वत्र फिरणाऱ्या या लांडोरला पाहण्यासाठी लोक गर्दी करीत आहेत.



पालीतील ग्रामस्थ प्रशांत हिंगणे यांनी येथील रोहिदास नगर येथे लांडोर आल्याची महिती दिली. त्यानंतर वन्यजीव रक्षक दत्तात्रय सावंत यांनी वनविभागाला ही माहिती दिली. तत्काळ वनविभागाचे कर्मचारी विनोद जाधव या ठिकाणी पोहचले. त्यांनी इमारतीच्या गच्चीवर आलेल्या लांडोरचे निरीक्षण केले व तिला कोणतीही दुखापत झाली नसल्याचे सांगितले. येथील महिलांनी लांडोरसमोर पाणी ठेवले. हे पाणी मोराने प्यायले. त्यानंतर ही लांडोर तिथून उडून दुसऱ्या घराच्या छपरावर गेली, तसेच लांडोराला पकडण्याचे व दुखापत न करण्याचे वनविभागाने नागरिकांना आवाहन केले. रविवारी ही येथील बँक ऑफ इंडिया समोरील घराच्या छपरावर बसली होती यावेळी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती. अनेकांनी मोराला मोबाईलमध्ये कैद केले.

या वेळी वन्यजीवन रक्षक दत्तात्रय सावंत, केतन म्हसके, तुषार केळकर, शंतनू लिमये व ओमकार खोडागळे आदींनी जाळे टाकून लांडोरला पकडले, मात्र जाळ्यातून बाहेर काढताना लांडोर निसटले. त्यानंतर लांडोर तिथून उडून गेला. या लांडोरला सुखरूप पकडून जंगलात मुक्त करणे गरजेचे आहे. अन्यथा वाहनांची धडक लागून किंवा मोकाट कुत्रे व कावळे यांच्यामुळे या लांडोरला धोका संभवतो.

# म्हसळ्यातील चोरी प्रकरणातील आरोपीला कारावास

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरातील बाजारपेठेत एका पानपट्टी दुकानात चोरी व एक स्कूटर लंपास करणाऱ्या चोरट्याला श्रीवर्धन न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

शहरातील बाजारपेठेत असलेल्या वेलकम हे दुकान चोरट्याने फोडून ४४ हजारांचा मुद्देमाल आणि रोख रक्कम लंपास केला होता. त्याप्रमाणे याच चोरट्याने गुलिस्तान अपार्टमेंटमधून एक स्कूटरही चोरी केली. या घटनांचा तपास तातडीने करून पोलिसांनी रत्नागिरीतील खेड येथून आरोपी हैदर अझीझ पठाण याला मुद्देमालासह अटक केली. पोलिसांनी आरोपीला श्रीवर्धन प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले असता त्याला दोन वर्षे साधा करावास व १००० रु. दंड शिक्षा, स्कूटर चोरीच्या गुन्ह्यांत तीन महिने साधा कारवास व २००० रु. दंड अशी शिक्षा ठोठावली.

# चौक शाळेत राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन



**मोहोपाडा : वार्ताहर**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित, प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिर चौक येथे राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त वंदन लोकराजाला कार्यक्रम शनिवारी (दि. ६) झाला.

या वेळी प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिराच्या अध्यक्ष तसेच विद्या प्रसारिणी सभा चौकच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड, समन्वयक देवानंद कांबळे, रिना नखाते, चेतन मालुसरे, प्रिती पडारी, दिपक शिंदे आदी उपस्थित होते.



**खालापूर : श्रीक्षेत्र महड येथे गोवंशाची निर्दयीपणे झालेल्या हत्येच्या निषेधार्थ खालापुरातील हिंदूत्ववादी संघटनेच्या वतीने तहसीलदार आयुब तांबोळी यांना निवेदन देऊन आरोपींना कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. या वेळी हभप काशिनाथ पार्टे, दिनेश महाडिक, संदेश पाटील, महेश पाटील, शशिकांत मोरे व कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : अरुण नलावडे)

# श्रीवर्धन बाजारपेठेत रानमेवा दाखल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बाजारपेठेत रानमेव्याची आवक मुबलक प्रमाणात होत असल्याचे पहायला मिळत आहे. मार्च महिना सुरू झाल्यानंतर ओले काजूगर, काजूची फळे, पिकलेले आंबे, करवंदे, जांभळे, पांढरे जांभ, लाल जांभ, कच्च्या कैऱ्या, रांजणाची फळे बाजारपेठेत विक्रीसाठी आलेली दिसून येतात.



यामध्ये सर्वात जास्त मागणी ओल्या काजूगारांना असते कारण ओल्या काजूगरांची भाजी अतिशय रुचकर होते.

श्रीवर्धन तालुक्यातील आदिवासी बांधव, भगिनी ओले काजूगर त्याचप्रमाणे काजूची फळे, करवंदे, जांभळे, रांजणाची फळे इत्यादी विक्रीसाठी आणत असतात. रानमेव्याची विक्री करून त्यांना फायदादेखील मोठ्या प्रमाणात होतो. रानमेव्याची खरेदी करताना ग्राहकांचा कल मात्र डोंगरची काळी मैना म्हणून ओळखली जाणारी करवंदे व जांभळे खरेदी करण्याकडेच जास्त आहे. जांभळाची फळे खाल्ल्याने मधुमेह कमी होतो, असे बोलले जाते, तसेच जांभळाच्या बिया सुखवून त्याची पावडरदेखील मधुमेहावर औषध म्हणून वापरली जाते. त्यामुळे जांभळाच्या फळांना मागणीदेखील मोठ्या प्रमाणावर आहे. प्रतिकिलो १५० ते २०० रुपये इतका दरदेखील जांभळाच्या फळांना मिळत आहे.

# चौक ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आरोग्य शिबिर; अनेकांनी घेतला लाभ

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी श्रीयांश मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिक सभागृहात आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. त्याचा अनेक गरजू रुग्णांना फायदा झाला.

चौकच्या सरपंच रितू ठोंबरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. अनेक रुग्णांनी रक्तदाब, मधुमेह तपासण्या करून घेतल्या. ज्या रुग्णांना ईसीजी करण्याची गरज होती, त्यांचाही ईसीजी मोफत करून दिला.

या वेळी पायांच्या संवेदना, शरीराला मुंग्या येणे, हाडांचे विकार, स्त्रियांचे आरोग्य व आजार यावर माहिती दिली. दमा, सांधेदुखी, लकवा, किडनीचे विकार, मेंदूचे विकार, पोटाचे आजार, फुफ्फुस यांची तपासणी करून मोफत औषधे देण्यात आली.

या वेळी श्रीयांश हॉस्पिटलचे डॉ. रमेश म्हात्रे, त्यांचा स्टाफ, ग्रामपंचायत सदस्य निखिल मालुसरे, सुभाष पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या आरोग्य शिबिराच्या आयोजनाबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



# पक्ष्यांसाठी अंगणी व परसदारी पाणी

## वाढत्या तापमानामुळे पक्षीप्रेमी सरसावले



**माणगाव : प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागली आहे. जंगलांमध्ये तसेच पशूपक्षी अधिवासात पाणी व खाद्याच्या कमतरतेमुळे त्यांना वणवण करावी लागत आहे. यासाठी पक्षीप्रेमी नागरिक सरसावले असून खास पक्ष्यांसाठी पाणी व खाद्याची अंगणात, परसदारी, घराचे सज्जे व टेरेसवर व्यवस्था करण्यात येत आहे.

उन्हाळा सुरू झाल्यावर मोठ्या प्रमाणात जंगलातील प्राणी, पक्ष्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. यामध्ये खास करून पाणी व अन्नाची मोठी कमतरता भासते. यामुळे अनेक जंगली पशूपक्षी आपला अधिवास सोडून जातात.

उन्हाळी दिवसात पशूपक्ष्यांना पाणी व अन्नाची उणीव भासू नये यासाठी पर्यावरण प्रेमी, पक्षीप्रेमी नागरिक पुढे सरसावले असून घरांच्या अंगणी, परसदारी, बाल्कनी इत्यादी ठिकाणी आवर्जून पाण्याची सुविधा केली जात आहे. खास पक्ष्यांसाठी पाणी व अन्न ठेवले जात आहे. लहान मडकी, भांड्यांतून पाण्याची व्यवस्था केली जात आहे.

**उन्हाळी दिवसात अनेक पक्ष्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. यामुळेच घराच्या खिडकीत पक्ष्यांसाठी खास पाणी व धान्य ठेवले आहे. अनेक पक्षी या ठिकाणी येऊन बिनधास्त पाणी पितात.**
**-दीपक ठाकूर, पक्षीप्रेमी**

**उन्हाळी वातावरणात या वर्षी तापमान वाढत आहे. त्याचप्रमाणे गेल्या काही दिवसांत जंगलात अनेक वेळा वणवे लागले आहेत. अनेक पक्षी वणवण फिरताना दिसतात. अशा पक्ष्यांना पाणी या सुविधा उपलब्ध करावी या हेतूने घरच्या अंगणात खास पक्ष्यांसाठी पाणी ठेवले जाते. त्यांनाही दिलासा मिळत आहे.**
**-मिहिर मोंडे, प्राणीप्रेमी**

# पेण येथे ब्रम्हर्षी व्यासदेवजी मेमोरियल क्रिकेट स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर व्यासदेवजी मेमोरीयल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि. ६) संत निरंकारी मंडळ दिल्लीचे व्यवस्थापक मोहन छाबरा यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले.

या वेळी ते म्हणाले की, गेली २२ वर्षे या स्पर्धा महारााराष्ट्रात होत आहेत, परंतु कोणत्याही प्रकारचा दुजाभाव न ठेवता कोणत्याही प्रकारची नाराजी रुसवा न ठेवता महात्मा सेवादल या खेळांचा आनंद घेत असतात. विश्वबंधुत्व हेच माझे मिशन आहे. सर्वांनी हार-जीत न मानता आनंदी जीवन जगून मनाने तसेच शरीराने निरोगी बनावे असा त्यांनी सर्वांना आशीर्वाद दिला. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून १४ संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धांच्या उद्घाटनाला क्षेत्रीय प्रबंधक सोलापूर इंद्रपाल नागपाल, सातारा नंदकुमार झांबरे, धुळे हिरालाल पाटील, मुंबई मोहन गुंडू, दीपक शेलार, अमोल सुर्वे, बाळासाहेब पवार, किशोर माने, प्रकाश म्हात्रे, प्रवीण पाटील तसेच रायगड झोन-४०मधून संयोजक खरसई-सेवादल अधिकारी, क्रिकेट कमिटी बळीराम कासारे, मनोज सिंग, मारुती कासारे, चेतन पाटील, कृष्णा विश्वकर्मा यांच्यासह मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.



























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com